बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

आपला महाराष्ट्र

₹२.०० | संस्थापक - लोकमित्र भाई मदाने | www.aplamaharashtra.in

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.१९१ ■ बुधवार १५ एप्रिल २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd. No./DHL/53/24-26

उत्कृष्ठ क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रूट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

चीनने तोडला अमेरिकेच्या नाकाबंदीचा चक्रव्यूह
तेलाने भरलेली जहाजे होर्मुज सामुद्रधुनीतून बाहेर

तेहरान, दि. १४ : मध्य-पूर्व आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी टाकलेली सर्वात मोठी खेळी केवळ अपयशी ठरली आहे. होर्मुजच्या सामुद्रधुनीत अमेरिकेने केलेली नाकेबंदी तोडून चीन आणि इराणच्या जहाजांनी यशस्वीपणे प्रवास केला आहे. यामुळे ट्रम्प यांच्या लष्करी शक्तीवर आणि निर्णयावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. दुसरीकडे या जागतिक वादात भारताची पंधरा जहाजे अडकून पडल्याने भारताची चिंता वाढली आहे.

अमेरिकन सैन्याने होर्मुजमध्ये १३ एप्रिलला सायंकाळी कडक नाकेबंदी जाहीर केली होती. प्रत्येक येणाऱ्या-जाणाऱ्या जहाजाची तपासणी करण्याचा इशारा दिला होता. मात्र, भारताच्या वेळेनुसार सायंकाळी साडेसात वाजता चीनच्या रिच स्टारी या जहाजाने ही नाकेबंदी अक्षरशः पायदळी तुडवली. या जहाजावर अडीच लाख बॅरल मेथनॉल लादलेले होते. विशेष म्हणजे, या जहाजाच्या मालकावर अमेरिकेने आधीच निर्बंध घातले असतानाही अमेरिकन नेव्ही या जहाजाला रोखू शकली नाही. चीन पाठोपाठ इराणच्याही एका जहाजाने नाकेबंदीतून वाट काढली. ज्यामुळे अमेरिकेच्या दाव्यांमधील हवाच निघून गेली आहे.

भारताची १५ जहाजे समुद्रातच

इराण आणि अमेरिका यांच्यातील या संघर्षात भारताला मोठा फटका बसला आहे. इराणने भारतीय जहाजांवर आमची कोणतीही बंदी नाही आणि आम्ही टोलही आकारत नाही, असे स्पष्ट केले आहे. तरी अमेरिकेच्या नाकेबंदीच्या भीतीमुळे भारताची पंधरा जहाजे होर्मुजमध्ये अडकली आहेत. अडकलेल्या जहाजांमध्ये कच्च्या तेलाचे सहा टँकर (ज्यात पाच पूर्ण भरलेले आहेत), एलएनजी आणि एलपीजीचे प्रत्येकी एक जहाज, तसेच कंटेनर आणि कार्गो शिप्सचा समावेश आहे. भारतीय नौदलाची या जहाजांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी धडपड सुरू आहे. अकरा एप्रिलनंतर भारताचे एकही मोठे जहाज या भागातून पुढे जाऊ शकलेले नाही. **(पान ४ वर)**

अशोक खरात रवानगी पुन्हा पोलिस कोठडीत

नाशिक, दि. १४ : नाशिक मधील भोंदूबाबा अशोक खरात याच्या अडचणीत वाढ झाली आहे. तिसऱ्या गुन्ह्यातील पोलिस कोठडीची मुदत संपल्यानंतर आज अशोक खरातला व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे नाशिक जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खरातला १८ एप्रिलपर्यंत (पाच दिवस) पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

सुरक्षेच्या कारणास्तव अशोक खरातला आज प्रत्यक्ष न्यायालयात न आणता व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर करण्यात आले. सुरुवातीला तांत्रिक अडचणीमुळे न्यायालयाचा आवाज खरातपर्यंत पोहोचत नसल्याने सुनावणी काही काळ थांबवावी लागली होती. तांत्रिक बिघाड दूर झाल्यानंतर सुनावणी पुन्हा सुरू झाली. **(पान ४ वर)**

लोकसभेतील खासदारांची संख्या आठशे पन्नास होणार
महिला आरक्षण तयारी; पस्तीस जागा केंद्रशासित क्षेत्रात

नवी दिल्ली, दि. १४ : देशातील लोकप्रतिनिधित्व अधिक समतोल आणि व्यापक करण्यासाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. लोकसभेतील एकूण जागा ५४५ वरुन ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. त्यासाठी संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक २०२६ संसदेत मांडले जाणार आहे. या प्रस्तावानुसार ८१५ जागा राज्यांसाठी तर ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. संसदीय कार्य राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या माध्यमातून हे विधेयक सादर होणार आहे.

या विधेयकामुळे लोकसभेच्या संरचनेत मोठा बदल होणार आहे. सध्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी जागांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाढते शहरीकरण, स्थलांतर आणि राज्यांमधील लोकसंख्येतील असमतोल लक्षात घेऊन हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयकाद्वारे अनुच्छेद ८१ मध्ये बदल करण्यात येणार आहे. तसेच लोकसंख्येची नवी व्याख्या निश्चित केली जाणार असून, संसदेद्वारे मान्य केलेल्या जनगणनेनुसारच प्रतिनिधित्व निश्चित होईल.

डिलिमिटेशन प्रक्रिया अधिक गतिमान

या विधेयकात डिलिमिटेशन प्रक्रियेतही मोठे बदल सूचवण्यात आले आहेत. जागांचे पुनर्निर्धारण करण्याची जबाबदारी स्पष्टपणे निवडणूक आयोगाकडे सोपवण्यात येणार आहे. यासाठी २०२६ नंतरच्या जनगणनेची वाट पाहण्याची अट हटवून प्रक्रिया अधिक लवचिक करण्यात आली आहे. हा प्रस्ताव नारी शक्ती वंदन अधिनियम लागू करण्यासाठी महत्त्वाचा **(पान ४ वर)**

देशात पाच विधानसभांच्या निवडणूकीनंतर
पेट्रोल अठरा, डिझेल पस्तीस रूपयाने महागणार

नवी दिल्ली : कच्च्या तेलाच्या वाढत्या किंमतीमुळे पेट्रोल १८ आणि डिझेल ३५ रुपये प्रतिलीटर महाग होण्याची शक्यता आहे. कच्च्या तेलाचे दर वाढले तरीही देशात पेट्रोल,डिझेलच्या किंमती स्थिर आहेत. त्यामुळे कंपन्यांना मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या निवडणुका संपताच कंपन्यांकडून पेट्रोल, डिझेलचे दर वाढवण्याची शक्यता आहे.

कच्चे तेल महागल्याने कंपन्यांना प्रतिलिटर पेट्रोलवर १८ आणि डिझेलवर ३५ रूपये नुकसान होत आहे. मागील महिन्यात तीन कंपन्यांना जवळपास दोन हजार चारशे कोटींचे नुकसान सहन करावे लागले. उत्पादन शुल्कात दहा रुपये कपात केल्यानंतर हे नुकसान एक हजार ६०० कोटींपर्यंत घसरले. प्रत्येक दहा डॉलरच्या वाढीनंतर नुकसान सहा रुपये प्रतिलिटरने वाढत आहे.

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी अंदाजे ८८ टक्के आयात करतो. यापैकी ४५ टक्के मध्य पूर्वेकडून आणि ३५ टक्के रशियाकडून येते. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती केवळ तेल कंपन्यांसाठीच नव्हे तर देशाच्या चालू खात्यातील तुटीसाठी देखील धोकादायक ठरत आहेत. यंदाच्या पहिल्या तिमाहीपर्यंत ही तूट वीस अब्ज डॉलर्सपर्यंत वाढू शकते असा अंदाज आहे.

उत्पादन शुल्क ८ टक्के घटले

सरकारी महसुलात तेलावरील उत्पादन शुल्काचा **(पान ४ वर)**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर अनुयायी नतमस्तक; लोकप्रतिनिधींचे अभिवादन

धुळे, दि.१४- महामानव भारतरत्न डॉ.भिमराव रावजी आंबेडकरांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या पुर्णाकृती पुतळ्या समोर हजारो अनुयायी नतमस्तक झाले. तसेच अभिवादनासाठी सामाजिक, सांस्कृतिक तसेच राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी मोठी रांग लावली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीचे औचित्य साधुन पुतळ्यास माल्यार्पण, संविधान वाटप, भंडारा, मोटर सायकल रॅली, चहापान, भिम गितांचा कार्यक्रम यांसारखे विविध कार्यक्रम जल्लोषात घेण्यात आले.

शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या धुळे बस स्थानकाजवळील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला माल्यार्पण करतांना खा.डॉ.शोभा बच्छाव, आ. अनुप अग्रवाल, माजी आ.शरद पाटील, साक्रीच्या महिला आमदार, आ.भदाणे, माजी खा.डॉ.सुभाष भामरे, भाजपा जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, बापू खलाणे, विजय पाच्छापूरकर, आरपीआयचे शशिकांत वाघ, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्सना पाटील, नगरसेवक सुनिल बैसाणे, ललित माळी, निलेश नेमाने, नगरसेविका डॉ.निशा महाजन, डॉ.सुशिल महाजन, ज्येष्ठ नेत्या मिना बैसाणे, प्रभाकर जाधव, प्रशांत बागुल, माजी नगरसेविका यमुनाबाई जाधव, नगरसेविका वंदना भामरे, राहुल वाघ, सागर चौधरी, संजय भामरे, रणजितराजे भोसले, नगरसेविका प्रतिभा चौधरी, मणी खैरनार, जगन ताकटे, एमआयएमचे इर्शाद जहागीरदार, नगरसेवक जावीद बिल्डर, हिलाल माळी, भटू गवळी, हेमा हेमाडे, नगरसेविका छाया अहिरराव, मंगला सोनवणे, डिगंबर चौधरी, किरण जोंधळे, शुभम जगदाळे, संदीप चव्हाण, शरद गोसावी यांच्यासह अनेक सामाजिक व राजकीय मान्यवरांनी अभिवादन केले.

शहरात विविध भागांत असलेल्या बाबासाहेबांच्या पुतळ्यांपासून भव्य मिरवणुकांचे मध्यवर्ती पुतळ्याजवळ सांगता झाली. मिरवणुकांमधून डी.जे.च्या तालावर भिमगीतांवर तरूणाई थिरकांना दिसुन आली. काहींनी बाबासाहेबांच्या जीवन चरित्रावर आधारीत प्रबोधनात्मक देखावे सादर केले.

बसपातर्फे संविधान वाटप

डॉ.बाबासाहेबांच्या पुर्णाकृती पुतळयाजवळ बहुजन समाज पार्टीच्यावतीने संविधान वाटपाचा कार्यक्रम **(पान ४ वर)**



स्कूल ऑफ फार्मसी अँड टेक्नॉलॉजी मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांचे गेटमध्ये यश

धुळे, दि.१४- धुळे येथील एस.व्ही.के.एम. एन.एम.आय.एम.एस. ग्लोबल युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी अँड टेक्नोलॉजी मॅनेजमेंट (पूर्वीचे एस.व्ही.के.एम. इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, धुळे) विभागाने ग्रॅज्युएट अॅप्टीट्यूट टेस्ट इन इंजिनिअरिंग (गेट)२०२६ या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत पुन्हा एकदा शैक्षणिक उत्कृष्टतेची परंपरा कायम राखली आहे. संस्थेतील एकूण ९ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश मिळवून उत्कृष्ट गुणांसह ऑल इंडिया रँक मिळवले असून, संस्थेचा लौकिक अधिक उंचावला आहे.

या यशामध्ये हर्ष ब्रजेश जैन याने ७०७ गुणांसह ऑल इंडिया रँक २४१ मिळवत संस्थेमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याच्या या उज्वल कामगिरीमुळे संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेवर शिक्कामोर्तब झाले आहे. याशिवाय चेतन प्रभाकर विभांडिक ऑल इंडिया रँक ४०५३, वैष्णवी जितेंद्र सोंजे ५१९०, जान्हवी यशवंत कवटे ५८१२, यशकुमार दिपकभाई पाटील ६०५२, प्राची शामकांत बोरसे ८५१३, वैष्णवी दिपक मोरे १०८१३, जयेश सुभाष अहिरे १६५१४, प्रियंका दगडू पवार १७६७९ यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

गेट (ग्रॅज्युएट अॅ प्टिट्यूड टेस्ट इन इंजिनिअरिंग) ही परीक्षा देशातील अत्यंत स्पर्धात्मक **(पान ४ वर)**

दिपक ज्वेलर्स
सोने 22k-1,39,400 रु.+3% GST
सोने 24k-1,52,200 रु.+3% GST
चांदी - 2,45,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

जांभुळ ज्युस मिळेल

नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या जांभळा पासून तयार केलेला रस (ज्युस) उपलब्ध आहे. कोणताही रंग, संरक्षक (प्रिझर्व्हेटीव्ह), पाणी न टाकता बनवलेला जांभळाचा शुद्ध रस (ज्युस) 200.MLच्या काचेच्या बाटलीत उपलब्ध आहे.
संकेत नित्या फार्म
जनशक्ती बिल्डींग दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग- धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

महिला महाविद्यालयातर्फे शाश्वत विकास विषयावर चर्चासत्रात्मक परिषद उत्साहात

नंदुरबार,दि.१४(प्रतिनिधी)- ट्रायबल एज्युकेशन सोसायटी संचालित महिला महाविद्यालय व अपूर्व पब्लिशिंग हाऊस, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत विकास: संधी, आव्हाने व संशोधन या विषयावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्र ऑनलाईन पद्धतीने संपन्न झाले. या चर्चासत्राचे उद्घाटन व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजीराव पाटील यांच्या हस्ते झाले.

यावेळी ट्रायबल एज्युकेशन सोसायटी चे सचिव सुर्जितसिंग वसावे तसेच महिला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुनील कुवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. चर्चासत्राचे बीजभाषण इंग्रजी विभाग, लॅम्पग विद्यापीठ इंडोनेशिया एॅक्सेंट्रो मॅक्समिलन यांनी केले. त्यांनी शाश्वत विकासासाठी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग कसा करता येईल, यावर मार्गदर्शन केले. उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी इंग्रजी विभाग, लखनौ विद्यापीठचे डॉ. आर.पी. सिंग होते. त्यांनी जबाबदार नागरिक म्हणून शाश्वत विकासातील भूमिका व समावेशक शिक्षणात एआयचे महत्त्व स्पष्ट केले.

तसेच प्राध्यापक, रेडियंत कॉलेज, जबलपूर डॉ. देवेंद्र विश्वकर्मा यांनी १७ शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी स्वस्त व स्वच्छ ऊर्जा, सन्मानजनक काम व आर्थिक वाढ, उद्योग व नवोपक्रम, असमानता कमी करणे, **(पान ४ वर)**

वारुड येथे पालकमंत्री रावलांच्याहस्ते विकास कामांचे भूमिपूजन उत्साहात

धुळे, दि. १४- वारुड परिसरात विविध उद्योगांच्या माध्यमातून स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

शिंदखेडा तालुक्यातील वारुड येथे सामाजिक सभागृह बांधकाम तसेच गुलजार नदीवरील दलित वस्तीला जोडणाऱ्या पुलाच्या बांधकामाचे भूमिपूजन नुकतेच करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील,कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती जिजाबराव सोनवणे,माजी जिल्हा परिषद सभापती संजिवनी सिंसोदे, पंकज कदम, **(पान ४ वर)**

कुमार नगरात हल्ला पोलीसांत गुन्हा नाही

धुळे, दि.१४- शहरातील कुमार नगरात सिंधी पंचायत दिनानिमित्त कार्यक्रम होत असतांना दोन गटांत वाद उफाळला. त्यात बहावलपूरी युवा मंचचे अध्यक्ष ललित तनेजा आणि नगरसेवक ललित अरूजा यांचे गट परस्परांसमोर उभे राहिले.

या घटनेत ललित तनेजा त्यांचा भाऊ संजू तनेजा सह चार जण जखमी झाले. तसेच नगरसेवक अरूजा यांच्या गटातील काही जण जखमी झाले. मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली. शहर पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली त्यानंतर मध्यस्थी करीत वाद निवळला. नंतर पून्हा वाद उफाळला हल्ल्यात लाठ्या, काठ्या, चाकुचा वापर झाल्याचे समजते. त्यात मयुर सिंधी आणि विकी अरूजा जखमी झाले आहेत. परतू शहर पोलीस स्टेशनला घटनेची नोंद नाही.

वन्यजीव तस्करी करणारे तिघे जेरबंद
कोल्हे, पोपट आणि तितरांचा समावेश

नंदुरबार, दि.१४ (प्रतिनिधी)-स्थानिक गुन्हे शाखेने वन्यजीवांची तस्करी करणाऱ्या टोळीवर कारवाई करत ३ आरोपींना अटक केली असून, त्यांच्या ताब्यातून मोठ्या प्रमाणात पक्षी जप्त करण्यात आले आहेत. ही कारवाई दि. १३ रोजी एप्रिल रोजी करण्यात आली. मालेगावहून वडोदराकडे जाणारे हे वाहन पोलिसांच्या सतर्कतेमुळे अडविण्यात यश मिळाले आहे.भाजीपाला कॅरेटच्या आड ही तस्करी केली जात असल्याचे उघडकीस आले.

पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांना मिळालेल्या माहितीनुसार, तस्करीसाठी वापरले जाणारे वाहन एम एच ४१/एयु-२३५२ हे संशयास्पद असल्याचे आढळले. त्यानंतर विसरवाडी पोलिसांनी सापळा रचून वाहन ताब्यात घेतले. तपासादरम्यान वाहनातून विविध प्रजातींचे पक्षी आढळून आले. या प्रकरणी शहजाद अहमद अतिक अहमद (वय ४७), रा. अ. जुब्बल नगर, मालेगाव, जि. नाशिक, मोमीन मोसिनुद्दीन शरीफ (वय ३२), रा. एरंडोल, जि. जळगाव, रोशन अफजल कुरेशी (वय २४), रा. गुलजार पार्क, मालेगाव, जि. नाशिक या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सदर कारवाईत पोलिसांनी पाच कोल्हे , नव्याण्णव जिवंत पोपट तसेच एकशे नव्वद तितर जातीचे पक्षीसह वाहन जप्त केले असून, एकूण २३ लाख ४० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी विसरवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रवण दत्त, अपर पोलीस अधीक्षक आशीत कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील, पोउनि मुकेश पवार, विकास गुंजाळ, रागेश वसावे,, अमोल बनसोडे, पोहेकॉ दीपक तिवरे, विशाल नागरे, मनोज नाईक, सचिन वसावे, जितू पाडवी, जितेंद्र तोरवणे, अभय राजपूत यांच्या पथकाने ही कारवाई केली.

ऊस बिल थकल्याने धनंजय अहिरराव यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचे आत्मदहन आंदोलन

पिंपळनेर,दि.१४(प्रतिनिधी)- साक्री तालुक्यातील अनेक ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी गेल्या पाच महिन्यांपासून (नोव्हेंबर २०२५) एस जे शुगर या साखर कारखान्याकडून ऊस बिल न मिळाल्याने टोकाचे पाऊल उचलत दि.१३ एप्रिल २०२६ रोजी साक्री तहसील कार्यालयासमोर आत्मदहन आंदोलनाचा प्रयत्न केला.उपस्थित पोलीस व प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप

केल्याने मोठा अनर्थ टळला.श्री धनंजय अहिरराव यांनी सांगितले की,गेल्या गळीत हंगामात साक्री तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी बबन गायकवाड यांच्या संभंदीत कारखान्याला गाळपसाठी दिलेला होता.शासनाच्या नियमानुसार १४ दिवसांत बिल मिळणे बंधनकारक असताना पाच महिने उलटूनही सर्व शेतकऱ्यांचे थकीत आहेत. वारंवार कारखाना प्रशासन व शासकीय अधिकाऱ्यांना निवेदने देऊनही दाद मिळाली नाही.कर्जाचे हप्ते, मुलांचे शिक्षण, दवाखाना, घरखर्च, मुला मुलींचे लग्न यामुळे कुटुंब आर्थिक विवंचनेत सापडल्याने नाईलाजाने सर्व बाधित शेतकऱ्यांना हे टोकाचे आंदोलन करावे लागले.

दि.३० एप्रिल पर्यंत संबंधित कारखान्याने २९०० प्रति टन प्रमाणे पैसे अदा न केल्यास आमरण उपोषण **(पान ४ वर)**

श्री स्वामी समर्थ केंद्रात महाप्रसाद

धुळे, दि.१४- शहरातील शिवाजी रोडवरील श्री स्वामी समर्थ गणेश मंडळाच्या वतीने श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त आज दि.१५ एप्रिल रोजी सकाळी ११ ते ४ या कालावधीत महाप्रसाद भंडारा वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जास्तीत जास्त भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री स्वामी समर्थ गणेश मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

देवळा (नाशिक) येथील सुप्रसिद्ध
डॉ.रमणलाल सुराणा व डॉ.सौ.शोभा सुराणा
हे खालील आजारांच्या विना ऑपरेशन उपचारासाठी दर महिन्याच्या १५ व १६ तारखेस उपलब्ध राहतील!
वेळ सकाळी १० ते १ व सायंकाळी ५ व ८
१) मुतखडा
२) पित्ताशयातील खडा
३) हृदयरोग व अर्धांगवायु
३) त्वचारोग, तीळ, मस
५) केस गळती
६) संतती न होणे व मासिक पाळीसंबंधीचे आजार
पत्ता : माहेर, १, संत डोंगरे महाराज नगर, सिद्धेश्वर हाईट जवळ, कॉटन मार्केट समोर, पारोळा रोड, धुळे
संपर्क : 9421603475

आपला महाराष्ट्र

नव्वदी पार केलेले नोबेल विजेते दलाई लामा

तिबेटच्या सर्वोच्च धार्मिक नेत्याला दलाई लामा म्हणतात.सध्याचे नव्वद वर्षांचे दलाई लामा हे तिबेटचे चौदावे धर्मगुरू आहेत. तेन्झिन ग्यात्सो हे त्यांचे मूळ नाव असून ते दीर्घकाळ दलाई लामा म्हणजेच धर्मगुरू असल्याने आपल्याला त्यांचेच नाव दलाई लामा आहे असे वाटते. पण तसे नसून तिबेटच्या सर्वोच्च धर्मगुरूंना दलाई लामा म्हणतात. आता पर्यंत तेरा दलाई लामा झाले तेन्झिन ग्यात्सो हे चौदावे आहेत,ज्ञानाचा महासागर असेही दलाई लामास मानतात. अनेक वर्षांपासून चीन या देशाने तिबेट वर केलेल्या आक्रमणामुळे बौध्द धर्मीय लामा निर्वासित झाले आणि हिमाचल प्रदेशातील धर्मशाला इथे आश्रयाला आले.भारताने त्यांना निर्वासित धर्मगुरू तसेच तिबेटचे निर्वासित पंतप्रधान म्हणून त्यांच्या सोबतच्या सहकारी शिष्यास सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या. निर्वासित तिबेटचे पंतप्रधान म्हणून ते धर्मशाला येथून कारभार चालवितात.गेल्या दशकात प्राध्यापक समदॉग रिनपोछे पंतप्रधान होते. दर पाच वर्षांनी ते बदलतात. मात्र दलाई लामा अर्थात धर्मगुरू कायम राहतात. परिणामी वयाच्या नव्वदाव्या वर्षी तेन्झिन ग्यात्सो कार्यरत आहेत. नुकतेच त्यांनी नव्वदाव्या वर्षात पदार्पण केले त्याबद्दल त्यांच्या दीर्घ आयुष्यासाठी एका मंदिरात प्रार्थना करण्यात आली. देश विदेशातील हजारो अनुयायांनी त्यात सहभाग घेतला होता.आपल्याकडे सत्ता बदलली असली तरी आजही तिबेटचे मुक्ती आंदोलन भारतातून चालू आहे. तिबेटची संस्कृती, भाषा आणि धार्मिक स्वातंत्र्याची जपणूक करणे हे तिबेटच्या मुक्ती आंदोलनाचे ध्येय आहे. या आंदोलनात दलाई लामा नेहमीच अहिंसा आणि संवादाची भाषा बोलत आलेले आहेत. आपल्या देशात त्यांना मागणी असते. ते जिथे जातात तिथे बुद्धाचे तत्वज्ञान आणि महात्मा गांधींच्या सत्य अहिंसेचा जागर करीत असतात. याही वयात ते कार्यरत आहेत. तिबेटमध्ये साधारणपणे चौदाव्या शतकापासून दलाई लामा ची परंपरा सुरू झाली १९३३ पर्यंत तेरा दलाई लामा झाले. सध्याचे तैन्झिन ग्यात्सो हे १९५० पासून दलाई लामा आहेत. दलाई ह्या शब्दाचा अर्थ महासागर असा आहे. लामा म्हणजे ज्ञान होय. या दोन शब्दांतून दलाई लामा अशी पदवी तयार झाली. ते जगभरातील अहिंसा, शांती, संदेशाचे वाहक आणि प्रतिक बनले आहेत. ते चीनमुळे निर्वासित झाले. भारतात येऊन आश्रय घेतला मात्र चीनला शरण गेले नाहीत. राजकीय संघर्षाचा सामना करीत तसेच सांस्कृतिक आव्हानांना तोंड देत मानवाधिकार टीकवून ठेवला. लोकशाही संवर्धनाचा आणि सहिष्णुतेचा मार्ग स्वीकारला. तिबेटच्या जनतेसाठी त्यांनी हा मार्ग स्वीकारला असला तरी तेवढ्या पुरताच ते मर्यादित राहिले नाहीत तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी अस्मितेसाठी मोठ्या धैर्याने आपल्या जीवनाचा त्यांनी होम केला आणि ते संपूर्ण जगातील मानव जातीचे प्रेरणास्थान बनले. पूर्वोत्तर तिबेटच्या एका साध्या घरातून सुरू झालेली तेनझिन ग्यात्सो यांची जीवनयात्रा आज जगभर करुणा, अहिंसा आणि शांततेच्या संदेशाची प्रतीक बनली आहे. निर्वासिताचे जिणे, राजकीय संघर्ष आणि सांस्कृतिक आव्हानांचा सामना करत त्यांनी लोकशाही, मानवाधिकार आणि सहिष्णुतेचा मार्ग स्वीकारला. त्यामुळे त्यांचे जीवन केवळ तिबेटी अस्मितेचे संरक्षण करणारेच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी आशा, धैर्य आणि संयमाचे प्रेरणास्थान ठरले आहे.

सन १९३७ मध्ये पूर्वोत्तर तिबेटच्याच्या एका छोट्याशा घरात ल्हामो थोंडुप नावाचा बालक जन्माला आला. जौची शेती, बटाटे आणि कॉबड्यांच्या साध्या वातावरणात वाढणाऱ्या या बालकाच्या चेहऱ्यावर गरीबी असुनही आनंद आणि निरागसतेची झळाळी होती. काही महिन्यांपासून एक शोध पथक त्या गावात आले होते. विविध आध्यात्मिक संकेत आणि परंपरेनुसार हे बालकच पुढील दलाई लामा असू शकते, अशी त्यांची खात्री झाली. अशी त्यांच्या संदर्भातील आख्यायिका प्रचलित आहे. जेव्हा त्या मुलास मागील दलाई लामांच्या काही वस्तू दाखवण्यात आल्या, तेव्हा त्याने सहजपणे त्या ओळखून हे माझे आहेत असे सांगितले. त्या निरागस प्रतिसादाने उपस्थित सर्वजण अचंबित झाले. बौद्ध परंपरेनुसार त्यांना करुणेचे बोधिसत्व अवलोकितेश्वर यांचा अवतार मानले जाते. लवकरच त्यांना मठात शिक्षणासाठी पाठवण्यात आले. पर्वत, दऱ्या, जंगली याक आणि निसर्गाच्या सान्निध्यात त्यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाचे सखोल शिक्षण घेतले. १९४० मध्ये त्यांना अधिकृतपणे थुबतेन ग्यात्सो यांचे अवतार म्हणून मान्यता देण्यात आली आणि त्यांचे नाव तेनझिन ग्यात्सो ठेवण्यात आले. केवळ १५व्या वर्षी नोव्हेंबर १९५० मध्ये, त्यांनी तिबेटच्या सुमारे सहा दशलक्ष लोकांचे आध्यात्मिक आणि राजकीय नेतृत्व स्वीकारले. हा काळ अत्यंत अस्थिर होता. त्याच वेळी चीनने तिबेटवर आक्रमण केले चीनचा चेहरा तेव्हा कम्युनिस्ट होता.त्यांनी पीपल्स लिबरेशन आर्मी च्या कम्युनिस्ट कारवाईद्वारे तिबेटवर नियंत्रण मिळवले.

तिबेटच्या स्वातंत्र्यासाठी मदत मिळावी म्हणून संयुक्त राज्य अमेरिका, ग्रेट ब्रिटन आणि नेपाळ येथे दूतमंडळे पाठवण्यात आली; मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावर कोणतीही ठोस मदत मिळाली नाही.

१९५९ मध्ये परिस्थिती अधिक गंभीर झाली. दलाई लामांना एका कार्यक्रमासाठी आमंत्रित करून अटक करण्याचा प्रयतन होईल, अशी भीती निर्माण झाली. तेव्हा केवळ २३ वर्षांच्या वयात त्यांनी सैनिकाचा वेष धारण करून गुप्तपणे तिबेट सोडले आणि भारतात प्रवेश केला. त्या वेळी भारत सरकारने त्यांना आणि हजारो तिबेटी शरणार्थ्यांना आश्रय दिला. हा निर्णय तिबेटी समाजाच्या अस्तित्वासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला.भारतामध्ये येऊन त्यांनी निर्वासित तिबेटी समाजाच्या पुनर्बांधणीसाठी मोठे कार्य केले. शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक विकासासाठी अनेक संस्था उभारण्यात आल्या. तसेच तिबेटी बौद्ध परंपरेचे संरक्षण आणि पुनरुजीवन करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयतन केले.

मानवता, करुणा आणि अहिंसेच्या संदेशासाठी १९८९ मध्ये त्यांना नोबेल शांतता पुरस्कार प्रदान करण्यात आला. आज ते मॅकलोडगंज येथे वास्तव्यास आहेत आणि जगभर शांतता व सहिष्णुतेचा संदेश देत आहेत.गेल्या महिनाभरात ११ मार्च २०२६ रोजी तेनशुक २०२६ अंतर्गत मॅकलोडगंज येथील मंदिरात त्यांच्या दीर्घायुष्यासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. देश-विदेशातून आलेल्या हजारो अनुयायांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.तिबेटी मुक्ती आंदोलनाचे ध्येय तिबेटियन संस्कृती, भाषा आणि धार्मिक स्वातंत्र्य जपणे हे आहे. या संघर्षात दलाई लामा नेहमीच अहिंसात्मक मार्ग आणि संवादाचा आग्रह धरत आले आहेत. आज ९० वर्षांच्या वयातही दलाई लामा अत्यंत सक्रिय आहेत. सुमारे ६०० वर्षांच्या इतिहासात सर्वाधिक काळ जगलेले ते दलाई लामा ठरले आहेत. आपल्या पुनर्जन्मावाबत त्यांनी स्पष्ट केले आहे की त्याबद्दलचा निर्णय तिबेटियन समुदाय घेईल. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर माझा जन्म एका स्वतंत्र जगात होईल असे त्यांचे भाकीत आहे.

धुळ्यात विराट हिंदू संमेलन उत्साहात धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

धुळे, दि.१४– धुळे शहरातील प्रभाग क्रमांक १६ मधील १०० फुटी रस्ता, चाळीसगाव चौफुली पोलीस स्टेशन परिसरात सकल हिंदू समाज व समर्थ नगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विराट हिंदू संमेलन अत्यंत उत्साहपूर्ण व भक्तीमय वातावरणात संपन्न झाले. या संमेलनास शहरातील विविध धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून श्री योगीजी दत्तनाथ महाराज गुरु गोरक्षनाथ आखाडा, शिंदखेडा तथा धर्मजागरण प्रांत संस्कृती प्रमुख, धार्मासिंग बाबाजी गुरुद्वारा प्रमुख तसेच श्री महंत जवराज बाबा शास्त्री लोणकर महानुभाव पंथ उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. दत्तात्रय चौधरी विभाग बौद्धिक प्रमुख, धुळे विभाग, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आरतीने करण्यात आली व मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी आर्या दुसाणे हिने सादर केलेल्या हिंदू की चादर या गीताने उपस्थितांच्या मनात राष्ट्राभिमानाची भावना दृढ केली. हजारोच्या संख्येने हिन्दू सहिष्णु माता भगिनी जेष्ठ नागरिक व तरूणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढविली.

आपल्या विचारप्रवर्तक भाषणांतून मान्यवरांनी हिंदू धर्मातील सहिष्णुता, संस्कृतीचे वैभव, परंपरेचे जतन आणि सर्वसमावेशक एकतेचे महत्त्व अधोरेखित केले. समाजातील विभाजनकारी प्रवृत्तींपासून सावध राहुन संघटित राहण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमासाठी धुळे शहरासह चारही तालुक्यातील महिला व पुरूषांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. या कार्यक्रमामुळे धार्मिक सहिष्णु वातावरण निर्माण झाले.

फडणवीसांना महाराष्ट्राचा कारभार झेपेना जमत नाही तर खुर्ची सोडावी : सपकाळ

मुंबई, दि. १४ : मुंबईतच नाही तर राज्याच्या कानाकोपऱ्यात ड्रग्सचा काळा धंदा सरकारच्या आशीर्वादाने सुरू आहे. भाजपा महायुतीच्या निर्लज्ज व नालायक सरकारमुळेच महाराष्ट्राची तरुण पिढी ड्रग्सच्या विळख्यात अडकली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना गृहमंत्रालयाचा कारभार झेपत नसल्याने त्यांनी राजीनामा देत खुर्ची रिकामी करावी, असा हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. मुंबईतील गोरेगावच्या नेस्को संकुलातील लाईव्ह म्युझिक कॉन्सर्टमध्ये दारू व ड्रग्सचा खुलेआम वापर करण्यात आला. ड्रग्समुळे दोघांचा मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर सपकाळ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे.

गोरेगावच्या नेस्को संकुलातील लाईव्ह म्युझिक कॉन्सर्टमध्ये दारू व ड्रग्सचा खुलेआम वापर होई पर्यंत पोलिस व सरकारी यंत्रणा झोपल्या होत्या का. आता कारवाईचे नाटक सुरू आहे. मुंबईतील एका भागात चार ते पाच हजार तरुणांची ड्रग्स पार्टी होते, याची भनक पोलिसांना कशी लागली नाही. मुंबईतील ही घटना दोन मृत्यूमुळे उघड झाली. पण, अद्याप पोलिस प्रशासन याकडे डोळेझाक करत आहे, असे स्पष्ट करीत सपकाळ म्हणाले की, मुंबई पोलिस व सरकारी यंत्रणांच्या नाकावर टिच्चून अशा ड्रग्स व दारूच्या पार्ट्या खुलेआम होत आहेत. गृहविभाग व पोलिस कोणाला पाठीशी घालत आहे, हे समजले पाहिजे. सरकारने पोलिस व सर्व यंत्रणांना फक्त टकेवारी, हेबी वसुली करणे व सर्वसामान्य जनतेकडून काय्दाचा गैरवापर करत वसुली करणे याच कामाला जुंपल्याचे चित्र महाराष्ट्रभर दिसत आहे.

पाटीलचा परवानगी कोणी दिली ?

नेस्कोतील चार-पाच हजार विद्यार्थ्यांच्या अशा पार्टीला परवानगी कोणी दिली. सरकार व पोलिस कोणाला पाठीशी घालत आहे, हे समजले पाहिजे. सरकारने पोलिस व सर्व यंत्रणांना फक्त टकेवारी, हेबी वसुली करणे व सर्वसामान्य जनतेकडून काय्दाचा गैरवापर करत वसुली करणे याच कामाला जुंपल्याचे चित्र महाराष्ट्रभर दिसत आहे.

राज्याची वाट लावली

राज्यात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत आहे. रोज भोंदूबाबांच्या घटना वाढत आहेत. महिला अत्याचार वाढत आहेत. देवेंद्र फडणवीस मोठमोठ्या गप्पा मारत असतात. पण, फडणवीस यांना गृहखातेच काय महाराष्ट्राचा राज्यकारभारही हाकता येत नाही. जमत नसेल तर खुर्ची खाली करा, पण महाराष्ट्राची वाट लावू नका, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

डॉ.बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त वैचारिक प्रबोधन आवश्यक- अॅड.संजय पुराणिक

शहादा,दि.१४(प्रतिनिधी)– भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त प्रज्ञासूर्य फाउंडेशनच्यावतीने अभिवादनाचा कार्यक्रम तळोदा येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ.राजेश पाडवी होते. डॉ.बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त वैचारिक प्रबोधन आवश्यक असल्याचे प्रतिपादन अॅड.संजय पुराणिक यांनी केले.

कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष अॅड.संजय पुराणिक उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. शशिकांत वाणी, नगराध्यक्ष भाग्यश्री चौधरी, उपनगराध्यक्ष शीतल पाडवी, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक अजय परदेशी, शिरीष माळी, शहराध्यक्ष गौरव वाणी, डॉ.स्वप्निल बैसाणे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.मेहुंद चव्हाण, पोलीस निरीक्षक राजन मोरे, सुरेश इंद्रजीत, डॉ.देविदास शेंडे, हर्षल तुरखिया, नगरसेवक कपिल कर्णकार, इमरान खाटीक, हितेंद्र क्षत्रिय, संदीप परदेशी, सुधीर माळी, ड.संदीप पवार, विजय सोनवणे, अंबालाल साठे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ.आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून व सामूहिक बुद्ध वंदनेने झाली. यावेळी अॅड.संजय पुराणिक यांच्या महाराष्ट्र राज्य बाल सुरक्षा आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना अॅड.पुराणिक म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे देशाला दिशादर्शक असून त्यांच्या जयंतीनिमित्त समाजात वैचारिक घुसळण होणे हीच खरी आदरांजली आहे.

डॉ.शशिकांत वाणी यांनीही बाबासाहेबांनी देश व धर्मावर केलेल्या उपकारांचा उल्लेख करत त्यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता अधोरेखित केली. अध्यक्षीय मनोगतात आ.राजेश पाडवी यांनी बाबासाहेबांविषयी कृतज्ञता व्यक्त करत, त्यांच्या संविधानामुळेच मला आमदार होता आले. त्यांनी दिलेला विचार हा जीवनाला दिशा देणारा आहे, असे सांगितले. लंडन येथील स्मारकाला दिलेल्या भेटीचा उल्लेख करत त्यांनी त्या ठिकाणाहून प्रेरणा मिळाल्याचे सांगितले. तसेच आगामी जुलै महिन्यात अमेरिकेत होणाऱ्या १३५ आमदारांच्या अभ्यास दौऱ्यासाठी आपली निवड ही बाबासाहेबांच्या विचारांमुळेच शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल नगरसेविका जयश्री महाले व हंसराज महाले यांचे त्यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष केदार, मुकुंदा बोरसे, सुनील पिंपळे, अशोक गवळे, ड. चंद्रकांत आगळे, डॉ.किशोर सामुद्रे, मिलिंद धोरे, सुजाता धोरे, श्यामप्रसाद आगळे, संतोष धनगर, ज्ञानेश्वर पाटील, पुष्पा वाघ, अश्विन महिरे, अरुण आगळे, यशवंत गवळे, साक्षी पिंपळे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आयोजन प्रज्ञासूर्य फाउंडेशन, तळोदा व फुले-शाहू-आंबेडकर विचारमंच यांच्यावतीने करण्यात आले.

भीम पहाट कार्यक्रम

प्रज्ञासूर्य फाउंडेशनच्यावतीने भीम पहाट या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी सात वाजल्यापासून भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीतांचे सादरीकरण करण्यात आले. या गीतगायनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तळोदा शहरात पहिल्यांदाच अशा प्रकारच्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याने भीम पहाट हा कार्यक्रम आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

क्रांतिवीर खाज्या नाईक प्रेरणा दिवस उत्साहात साजरा; नागरिक उपस्थित

शहादा, दि.१४ (प्रतिनिधी)– शहादा तालुक्यातील उनपदेव येथे क्रांतिवीर खाज्या नाईक यांच्या स्मृतिदिनानिमित्त खाज्या नाईक प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रामपूर प्लांटचे पोलिस पाटील लुका दादा होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक वाहरू सोनवणे, जेलसिंग पावरा, जगदिश पवार, निलसिंग महाराज, रेहमसिंग ठाकरे, अॅड.राजेंद्र ठाकरे, ओंकार पटले, तुकाराम वळवी होते.

या प्रसंगी प्रथम ढोल मंदलच्या तालावर आदिवासी एकता जिंदाबाद, खाज्या नाईक जिंदाबाद अशा घोषणा देत मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर खाज्या नाईक यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून आकाशात तीर सोडून क्रांतिवीर खाज्या नाईक यांना मानवंदना देण्यात आली. या नंतर मिरवणुकीचे सभेत रूपांतर करुन प्रथम मान्यवरांचे हस्ते तमाम आदिवासी क्रांतिवीर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी जेलसिंग पावरा, जगदिश पवार, अॅड.राजेंद्र ठाकरे, गंगाराम राहसे, वाहरु सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले.

वाहरू सोनवणे यांनी आपल्या मनोगतात आदिवासी, दलीत समाजाची आजही विविध मार्गाने फसवणूक केली जात आहे. शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा बाबासाहेबांचा मूलमंत्र दिला. तसेच या प्रसंगी ढोल मांदल विविध वाद्यासह उपस्थित लोकांना रोख स्वरूपात मानधन देउन सन्मान करण्यात आला. काही लोकं घुन्थ्य बाण सह उपस्थित होऊन स्पर्धेत सहभाग घेतला त्यांनाही प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक देऊन सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष पावरा यांनी केले करून आकाशात तीर सोडून क्रांतिवीर खाज्या नाईक यांना मानवंदना देण्यात आली. या नंतर मिरवणुकीचे सभेत रूपांतर करुन प्रथम मान्यवरांचे हस्ते तमाम आदिवासी क्रांतिवीर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी जेलसिंग पावरा, जगदिश पवार, अॅड.राजेंद्र ठाकरे, ओंकार पटले, तुकाराम वळवी होते. सूत्रसंचालन संतोष पावरा यांनी केले. आभार प्रदर्शन कालकथित सिद्धार्थ भाऊ बोरसे प्रतिष्ठान चे अध्यक्ष नगरसेवक नागसेन बोरसे यांनी केले. या वेळी जेष्ठ तबला वादक प्रकाश पवार, मधुकर शिरसाठ, ज्ञानेश्वर पवार,नितीन पाटील, जगदीश बोरसे तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रकाश में ता.१५ को चेतना

शहाद्यात एमएसएमई सक्षम अवेयरनेस कार्यशाळा संपन्न

शहादा, दि.१३ (प्रतिनिधी)– भारतीय जैन संघटना शहादा यांच्यावतीने एमएसएमई संदर्भातील सक्षम अवेयरनेस कार्यशाळा सुयोग्य घंट मंदिर, दादावाडी येथे उत्साहात पार पडली.

उद्योग, व्यवसाय व स्वरोजगाराला चालना देण्यासाठी आयोजित या कार्यशाळेत एमएसएमई अंतर्गत मिळणारे लाभ, विविध कर्ज योजना, सबसिडी, उद्यम नोंदणी यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. कांतीलालजी टाटीया होते तर प्रमुख अतिथी म्हणून जैन संघ अध्यक्ष अॅड. प्रदीप टाटीया, मूर्तिपूजक संघ अध्यक्ष विजय चोपडा, साधुमार्गी संघ अध्यक्ष फुलचंद लोढा, तेरापंथी सभा अध्यक्ष के.लास संचेती तसेच खान्देश विभागीय उपाध्यक्ष भवरलाल जैन यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी अहमदाबाद येथील प्रख्यात व्याख्याते निरंजन जुवा यांनी अत्यंत सोप्या व प्रभावी भाषेत एमएसएमई योजनांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी उद्योजकांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन व्यवसाय वाढवावा, असे आवाहन केले.

कार्यशाळेस उद्योग, व्यवसाय, स्वरोजगार क्षेत्रातील उद्योजक, युवक, महिला उद्योजिका, दुकानदार तसेच विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. पास पाण्ड उद्योग समूहाचे संचालक पासमल जैन, कचरुलाल नाहटा, प्रा.संपत कोठारी, संजय चोपडा, यश टाटीया, कल्पेश चोरडिया, किशोर चोरडिया, डॉ.राजेश जैन, डॉ.स्मिता राजेश जैन आदी मान्यवर उपस्थित होते. ही कार्यशाळा उद्योजकांसाठी अत्यंत मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरली. बीजेएस शहर अध्यक्ष नंदकिशोर चोरडिया, सेक्रेटरी संदीप चोरडिया यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा.मनोज बाफना यांनी केले.

खान्देश ही कलावंतांची भूमी– परदेशी गीत गायन स्पर्धेत मयुरी चव्हाण प्रथम

धुळे, दि.१४– विश्व विख्यात मंगेशकर परिवार, स्मिता पाटील, कवी ना.धो. महानोर, बाल कवी ठोंबरे यांसारखे दिग्गज कलावंत साहित्यिक या खान्देशच्या भूमीत जन्मलेली रत्न आहेत. म्हणूनच खान्देशला कलावंतांची भूमी म्हणून ओळखले जाते. नवोदित कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे काम केशराई सेवाभावी संस्थे तर्फे केले आहे. असे प्रतिपादन महापौर मायादेवी परदेशी यांनी केले.

कालकथीत सिद्धार्थ भाऊ बोरसे प्रतिष्ठान आणि केशराई सेवाभावी संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय गीत गायन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर माजी उपमहापौर तथा विद्यमान नगरसेवक नागसेन बोरसे, महादेव परदेशी, आप्पा खताळ, कवी जगदीश देवपूरकर, गायक पारिजात चव्हाण, युवक बिरादरीचे माधव ठाकरे, गुलाब धोरात आदी उपस्थित होते. गीत गायन स्पर्धेत जालना, मालेगाव, धरणगाव, जळगाव नंदुरबार, संभाजीनगर, धुळे आदी भागातून सुमारे ८५ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला.

गीत गायन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे रोख रुपये पाच हजार, स्मृती चिन्ह मयुरी कृषिकेश चव्हाण, द्वितीय क्रमांकाचे रोख रुपये तीन हजार, स्मृती चिन्ह जाकीर शेख, तृतीय क्रमांकाचे रोख रुपये दोन हजार, स्मृती चिन्ह संतोष एनडाईत यांना तर दोन उत्तेजनार्थ रोख रुपये पाचशे, स्मृती चिन्ह शोएब शेख आणि अमित भामरे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. परीक्षक म्हणून अहिल्यानगर येथील सुप्रसिद्ध गायक विपीन गायकवाड आणि गायिका जयश्री सोनार यांनी काम पाहिले.

स्पर्धेचे प्रास्ताविक केशराई सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सुरेश चवे यांनी केले. तर आभार प्रदर्शन कालकथित सिद्धार्थ भाऊ बोरसे प्रतिष्ठान चे अध्यक्ष नगरसेवक नागसेन बोरसे यांनी केले. या वेळी जेष्ठ तबला वादक प्रकाश पवार, मधुकर शिरसाठ, ज्ञानेश्वर पवार,नितीन पाटील, जगदीश बोरसे तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

BOOKING OPENS
ज्योती सिनेमास ३डी DOLBY DIGITAL PLUS
JYOTI

ता. ३० से रोज ३ खेल टा. ११:४५,४,८:४५ वजे | धुरंधर-२

तिकीट दर	गोल्ड	सिल्वर	बाल्कनी
	८०रु	८०रु	१३०रु

bookmyshow
9422789999/9823171599 jyoticinemadhule.

BOOKING OPENS
ज्योती सिनेमास ३डी DOLBY DIGITAL PLUS
JYOTI

ता.१७ से रोज ४ खेल टा. ११:४५,१:५०,६,९:१०वजे | भूत बंगला

तिकीट दर	गोल्ड	सिल्वर	बाल्कनी
	८०रु	८०रु	१३०रु

bookmyshow
9422789999/9823171599 jyoticinemadhule.



महात्मा फुले फाउंडेशनतर्फे वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

नंदुरबार, दि.१४(प्रतिनिधी)- शहरातील महात्मा फुले फाउंडेशनतर्फे क्रांतीज्योती महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शालेय विद्यार्थ्यांनी फुले यांच्या कार्याला उजाळा देत आपल्या वक्तृत्व कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन केले.

शहरातील श्री द्वारकाधीश मंदिराच्या सभागृहात पार पडलेल्या या स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त विकास अधिकारी हिरालाल महाजन होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त उपविभागीय अधिकारी संजय महाजन, सौ. दीपा महाजन, प्रा. डॉ. माधव कदम तसेच विद्या सरोज हॉस्पिटलचे संचालक डॉ. स्वप्निल महाजन उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी सामाजिक प्रगतीसाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे मत व्यक्त केले.

CHANGE NAME

MY OLD NAME WAS
SHAIKH VAHID
SHAIKH ABBAS
MY NEW NAME IS
VAHID ABBAS
SHAIKH
ADD-S/OABBAS SHAIKH, 121, 60 KHOLI MUNICPAL COLONY, DEOPUR, DHULE-424002

NAME CHANGE

I HAVE CHANGE
MY NAME FROM
SHAIKH
SHABNAM BANO
BINTE MUKHTAR
TO SHABNAM
SHAIKH MUQEET
ADD- DILDAR NAGAR, BHANGAR BAZAR, DHULE-424001

CHANGE OF NAME

I have Change
My Old Name From
MANYAR ANJOOM
SHE SATTAR
to My New Name
ANJUM BANO
RIZWAN AHMAD
MANIYAR
as per Documents
ADD- GHAR.NO.672, MUSLIM NAGAR NEAR MATIN KIRANA, DHULE

NAME CHANGE

MY OLD NAME WAS
SHEIKH AJIM
SHEIKH RASHID
MY NEW NAME IS
SHAIKH AZIM
SHAIKH RASHEED
ADD- PLOT NO.204, VADJAI ROAD, OPP. AKBAR BAG MIRZAGARDEN, DHULE

CHANGE OF NAME

My Old Name was
SHAKEELA BANO
ATAULLAH
My New Name is
SHAKEELA BANO
ATAULLAH ANSARI
ADDRESS- 89, GARIB NAWAZ NAGAR, NEAR BUSHRA HOTEL, HAZAR KHOLI, DHULE-424001

NAME CHANGE

MY OLD NAME WAS
SHAHIN SALIM
SHAIKH
MY NEW NAME IS
SHAHIN BANO
SHAIKH AZIM
ADD- PLOT NO.204, VADJAI ROAD, OPP. AKBAR BAG MIRZAGARDEN, DHULE

CHANGE NAME

MY OLD NAME WAS
SHAKILA BI
BINTE SHE
AYYUB BHANGI
MY NEW NAME IS
SHAKILA BI
WAHID SHAIKH
ADD- W/O WAHID SHAIKH H.NO.207, AGRA ROAD MOHAMMADI NAGAR, DEVPUR, NEAR DEVPUR, POLICE STATION, DHULE-424002

CHANGE OF NAME

My Old Name was
SAJID SHAIKH
IBRAHIM
My New Name is
SAJID IBRAHIM
MANSURI
ADDRESS- HAJI LOOKMAN NAGAR, VITABHATTI PARISAR, DEOPUR, DHULE-424002

जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व संबंधितांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे वलवाडी धुळे ता. जि. धुळे पैकी जि. प. धुळे व पं. स. धुळे पैकी धुळे महानगरपालिका हद्दीतील स.नं. १७२/३ पैकी प्लॉट नंबर - ३३ उत्तरेकडील क्षेत्र ८०चौ. मी. ही मिळकत सौ. भारती संतोष पाटील यांचे मालकीची असून प्लॉट नंबर ३३, दक्षिणेकडील क्षेत्र ८० चौ. मी.ही मिळकत ज्ञानेश्वर सुभाष शेवाळे व प्रतिभा भालचंद्र पाटील यांचे मालकीची असून त्या संदर्भात कबुली जबाबाचे मुखत्यारपत्र सौ. भारती संतोष पाटील यांना करून दिलेले आहे, यांसी चतु:सिमा पुर्वेस : ९ मीटर रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. २४, दक्षिणेस : प्लॉट नं. ३२, उत्तरेस : प्लॉट नं. ३४, सदर मिळकत आमचे अशिलाने श्री. ज्ञानेश्वर सुभाष शेवाळे, प्रतिभा भालचंद्र पाटील व सौ.भारती संतोष पाटील ह्यांचेकडून, कायम मालकी हक्काने खरेदी करण्याचा सौदा केला आहे. सबब सदर मिळकतीवर उपरोक्त उल्लेख केलेल्या व्यक्ती व्यतिरिक्त कब्जा, वहिवाट, गहाण, जप्ती, कोर्ट दावा, तारण, बक्षिस, इत्यादी कोणत्याही प्रकारे कोणाचाही हक्क, हरकत असेल, त्या हक्कदाराने सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील पत्त्यावर आपल्या हक्कासंबंधीच्या कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात कळवावे. जाहीर नोटीसीद्वारे परस्पर घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारे लेखी हरकत न आल्यास व हक्क संबंधीचे पुराव्याचे कागदपत्र न दिल्यास सदर मिळकतीवर श्री. ज्ञानेश्वर सुभाष शेवाळे, प्रतिभा भालचंद्र पाटील व सौ. भारती संतोष पाटील ह्यांचे व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क किंवा हितसंबंध नाही, असे समजून तसेच सदर मिळकत निर्बोज आहे असे ग्राह्य धरून आमचे आशिल सदर मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही हे या जाहीर नोटीशीने कळावे.

सदर जाहीर नोटीस आमचे आशिल यांनी दिलेल्या माहिती व सांगणेनुसार आमचे मार्फत प्रसिद्ध केली असे.

धुळे. दि. १४/०४/२०२६

ॲड.युवराज शांताराम भालेराव
५, राजनीला आनंद सहकारी सोसायटी, टागोर कॉलनी जवळ, देवपूर, धुळे.
मो. नं. ९८२२०७९९२६

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोहाडी प्र. लळींग येथील गट नं. ८७/१ पैकी प्लॉट नं. १६, चे एकूण क्षेत्र ४८८.९९ चौ. मी. यापैकी पुर्वेकडील भागाचे क्षेत्र १४४.९३ चौ. मी. १५५९.४४६८ चौ. फुट बखळ प्लॉट असून त्यांची चतु:सिमा व मापे मंजूर नकाशाप्रमाणे.

सदर मिळकतीचे मालक प्रशांत अरुण कर्णे, रा. हनुमान मंदिराजवळ, मिरच्या मारुती खुंट ५/६ बोळ, धुळे ता. जि. धुळे यांनी वर नमूद मिळकतीचा कायमस्वरुपी विक्रीचा व्यवहार आमचे पक्षकार यांचेसोबत सौदा पावती करार केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे पक्षकार हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकर पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही, कोणत्याही, प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांतरण, व्यवहार खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी मुळ कागदपत्रांसह हरकत कळवावी. येणे प्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे पक्षकार सदर मिळकत निर्बोज म्हणून व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

धुळे दि. १४/०४/२०२६

ॲड.परवेज निसार तांबोळी
३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगाव रोड, धुळे
मो. नं. ७०२०३८१३९४

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, शासकीय व निमशासकीय संस्था, वित्तीय संस्था, वगैरे यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवपूर (धुळे १) येथील सि. स. नं. ४४५७/अ ३ सत्ताप्रकार ड चे एकूण क्षेत्र ४१.३० चौ. मी. यामध्ये लोडबेअरिंगचे बांधीव घर (पडीत जागा) यांसी चतु:सिमा पुर्वेस : सि. स. नं. ४४५७/ब, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : रस्ता, उत्तरेस : सि. स. नं. ४४५७/अ पैकी.

सदर मिळकतीचा सौदा आमचे अशिल यांनी मंगला चुनिलाल भोई रा. देवपूर धुळे यांच्याशी केलेला आहे. सदर वरील वर्णनाची मिळकत ही आमचे अशिल कायम खरेदीने घेणार असून सौदा करण्यात येवून बयाण्याची रक्कम ही अदा करण्यात आलेली आहे. सदर वरील वर्णनाची मिळकत ही आमचे अशिल कायम खरेदीने घेणार असून त्याबाबत सौदा करण्यात येवून बयाण्याची रक्कम ही अदा करण्यात आलेली आहे. तरी आमचे अशिल लवकरच वरील प्लॉट मिळकतीचा कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत. कोणाचा काही हक्क, सौदापावती, खरेदी, भाडेपट्टा, हितसंबंध, वारस, तारण, गहाण, तबदील, बक्षिसपत्र, अन्य काही व्यवहार झाले असल्यास, कोर्टात दावा, अर्ज दाखल असल्यास कोणाची काही एक हरकत असल्यास, त्यांनी योग्य त्या कागदपत्रांसह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर १५ दिवसांच्या आत समक्ष येवून लेखी हरकत घ्यावी. परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासू १५ दिवसांच्या आत योग्य त्या कागदपत्रांसह कोणी काही एक हरकत घेतली नाही तर आमचे अशिल वर वर्णन केलेल्या मिळकतीचा कायम खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाची काही एक तक्रार ऐकली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

(सदरहू जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेली कागदपत्रे व माहितीच्या आधारे, आमचे मार्फत दिली असे.)

ठिकाण:धुळे दि. १३/०४/२०२६

ॲड.प्रमोद एम. चौधरी
१०८, ॲडव्होकेट चेंबर्स, जिल्हा न्यायालय, धुळे
मो. ९८६०७०६१७१

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : मिळकत नं. श्री. प्रेमदिप इस्टेट तर्फे स्वप्नील प्रेमचंद नहार यांच्या मालकी व कब्जे उपभोगात असलेली शेतजमीन ७/१२ उताराप्रमाणे) तुकडी जिल्हा धुळे परिषद व पंचायत समिती, धुळे हद्दीतील मौजे पुरमेपाडा येथील शिवारातील गट नं. १/ब/१/अ/२ चे क्षेत्र ०० हेक्टर ७४ आर. पो. ख. ० हे. ०० आर एकूण क्षेत्र ०० हे. ७४आर आकार रु. ०२.०० पैसे त्याचे वर्णन व क्षेत्र चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस : रस्ता व वस्ती — पश्चिमेस : शरद एकनाथ यांचे शेत
दक्षिणेस : तुषार रिखबचंद यांचे शेत — उत्तरेस : वस्ती

येणेप्रमाणे चतु:सिमेच्या आतील मिळकती ह्या हल्ली कब्जेदार व मालक श्री. प्रेमदिप इस्टेट तर्फे स्वप्नील प्रेमचंद नहार राहणार धुळे यांच्या असून यांनी वरील मिळकतीचा विक्रीचा सौदा आमचे अशिल यांचेशी केलेला आहे. त्यांनी आमचे अशिलाकडून बयाणापोटी रक्कम देखील स्विकारलेली आहे. तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचे काही हक्क, अधिकार, हितसंबंध, तारण, गहाणखत, सौदापावती, बोजा, मुखत्यारपत्र, इतर काही हक्क, संबंध, लीज, गहाण, तारण मे. कोर्टाचा मनाई हुकूम, कुठल्याही प्रकारची खरेदी विक्री, कुळ व अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार अगर तक्रार असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासोबत सदर आपली लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात)दिवसांच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर मुळकागदपत्रांसह प्रत्यक्ष येवून दाखवावे.मुदतीत न आलेल्या हरकती तसेच परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती आमच्या अशिलांवर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही व आमचे अशिल वरील मिळकती संदर्भात खरेदी विक्री व्यवहारपूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमच्या अशिलाने दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्र व सांगितलेवरुन त्यांच्यातर्फे आमच्यामार्फत प्रसिद्धीस दिली असे. कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे. धुळे दि. १२/०४/२०२६

ॲड.डी.के.पाटील मोबा.९५११८४३३९२
पत्ता: गाळा नं. पहिला मजला हिरेभवन, पाटील झेरॉक्सच्या बाजुला जिल्हा न्यायालयासमोर, धुळे ४२४००१

टायटल व्हेरीफिकेशनसाठी नोटीस

तमाम जनतेस, सर्व हितसंबंधीतांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानीक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ही श्री.भवानी ट्रेडर्स चे प्रो.प्रा.श्री.कानसिंग प्रेमसिंग राजपुरोहीत रा.धुळे यांना एमआयडीसी कडून ॲलोट केलेली मिळकत असून सदर मिळकतीच्या टायटल व्हेरीफिकेशन हेतू सदर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

तरी सदर मिळकतीत आजमितीस आयसीआयसीआय बॅकेचे कर्ज असून या व्यतिरीक्त कोणाचही कोणतेही प्रकारचे मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा वा लिज हक्क, ताबा हक्क वा सौदेकरार हक्क अगर खरेदी हक्क वैगेरे काहीही असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आंत त्याबददल स्वताच्या हक्काच्या प्रमाणीत झेरॉक्स प्रतिसह आम्हास वरील नमूद पत्त्यावर लेखी कळवावे, परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा तसेच दस्तऐवजांशिवाय घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

नियोजीत मुदतीत कोणाचीही साधार व लेखी तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज असून तथाकथीत हक्क व अधीकार संबंधीतांनी सोडून दिलेले आहे असे समजण्यात येईल. या नंतर कोणीही काहीही तक्रार, हितसंबंध अगर हक्क दाखविल्यास या मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी, कळावे.

परिशिष्ट

मौजे अवधान ता.जि.धुळे येथील एम आय डी सी अवधान येथील प्लॉट नं.ई-११५/३ चे क्षेत्र १८०.०० चौ.मी. चा प्लॉट/मिळकत आणि त्यावरील असलेले संपूर्ण बांधकामाचे सुमारे क्षेत्र ४४७.८३ चौ.मी. ची मिळकत. यासी चर्तु:सिमा येणेप्रमाणे असे.

पुर्वेस- २५ मी. एम आय डी सी रोड, पश्चिमेस- प्लॉट नं.ई-११६,
दक्षिणेस- प्लॉट नं.ई-११५/४, उत्तरेस- प्लॉट नं.ई-११५/२.

सदर नोटीस टायटल व्हेरीफिकेशनसाठी आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. **दिनांक-१३/०४/२०२६**

ॲड.राजेश नंदलाल अग्रवाल
ऑफिस- ५, दिघे ॲडव्होकेट चेंबर्स,
धुळे जिल्हा न्यायालया समोर, स्टेशन रोड, धुळे. मो.नं.९८५००९२७५३

टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व हितसंबंधी व वित्तीय संस्था, यांना या जाहीर नोटीसीने आमचे पक्षकार यांचे तर्फे ॲडव्होकेट बाळासाहेब अ. पवार रा. धुळे यांचे मार्फत कळविण्यात येते की,

आमचे पक्षकार (विकत घेणार) यांनी १) निसार अहमद अब्दुल रज्जाक शेख रा. माधवपुरा ग. नं. १४ धुळे (२) मोहम्मद शोएब अब्दुल गफ्फार शेख. रा. वडजाई रोड, गफुर नगर धुळे (विक्री करणार) श्री. अशोक मका उर्फ मुकंदा देवरे पाटील रा. वाडजाई ता. जि. धुळे यांचे मालकीचे मौजे वडजाई ता. जि. धुळे येथील सर्व्हे/गट नंबर १८०/१/ब यास लागवडी लायक क्षेत्र ०हेक्टर २९ आर. + पोट खराब क्षेत्र ० हे. ०० आर असे एकूण क्षेत्र ० हे. २९ आर आकार १ रु. ६३ पैसे पैकी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) नवी दिल्ली यांचेकडून संपादीत क्षेत्र ० हे. ०८ आर यास आकार ० रु. ४५ पैसे हे क्षेत्र वगळून उर्वरित जिरायत क्षेत्र ० हे. २१ आर आकार १ रु. १८ पैसे ही मिळकत यास चतु:सिमा पुर्वेस : गट नंबर १८०/१/अ, पश्चिमेस मधुकर पाटील यांची शेत जमीन, दक्षिणेस : सुरत नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ नविन ६ जुना, उत्तरेस : धुळे ते वडजाई बाभुळवाडी रस्ता.

ही मिळकत खरेदीचा सौदा मिळकत मालक (विक्री करणार) व आमचे पक्षकार (विकत घेणार) यांचेत झालेला असून मिळकत मालक यांना आमचे पक्षकार यांनी बयाणा रक्कम देखिल अदा केली आहे.

सदर मिळकती वर कोणताही बोजा नाही व मिळकतीचे टायटल क्लीयर आहे असे विक्री करणार यांचे म्हणणे आहे.

सबब उपरोक्त मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, बोजा, गहाण, भाडेपट्टा, टांच, जप्ती, खरेदी-विक्रीकरार, सौदापावती, हस्तांतरण, हिस्सा, अधिकार, बक्षिस, वारस हक्क, कोर्ट केसेस, हितसंबंध असल्यास व नियोजित व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आमचेकडे भेटून लेखी मुळ कागदपत्रासह हरकत नोंदवावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचेवर बंधनकारकर राहणार नाही. मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची व कोणचाही हितसंबंध नाही असे गृहीत धरुन खरेदी करतील. परस्पर वर्तमान पत्राद्वारे घेतलेली हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकारने दिलेल्या माहिती व कागदपत्र, अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. १३/०४/२०२६

ॲड.बाळासाहेब अ. पवार ॲडव्होकेट व नोटरी (भारत सरकार)
ऑफिस : अप्पर ग्राऊंड फ्लोअर गाळा नं. ५, फॉरच्युन प्लाझा, गणपती रोड, जैन मंदिराच्या शेजारी, शिवतिर्थ व संतोषीमाता चौक जवळ, धुळे
मो.नं.९४२३२३२९०४

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे नगांव बु. ता.जि.धुळे येथील गट नं.२९७/१ पैकी (१) प्लॉट नं.४१ चे क्षेत्र ७७.५० चौ.मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा- पूर्वेस- प्लॉट नं.३७, पश्चिमेस- रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नं.४२, उत्तरेस- प्लॉट नं.४०(२) प्लॉट नं.४२ चे क्षेत्र ८४.२५ चौ.मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा पूर्वेस- प्लॉट नं.३७, पश्चिमेस- रस्ता, दक्षिणेस- गटनं.२९७/३, उत्तरेस- प्लॉट नं.४१.

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक सोनल प्रमोद भावसार रा. घर नं.१३१३अ, गल्ली नं.४, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. **धुळे, दिनांक- १४/०४/२०२६**

ॲड.रोहित राजकुमार छाबिडया
ब्लॉक नं.आर/२, रूम नं.१, कुमार नगर, साक्री रोड, धुळे.
मो.नं.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१. मौजे म.कानडामाना येथील गट नं.५३० चे क्षेत्र ला.ला.० हे १३.७० आर + पो.ख. ० हे ०१ आर एकूण ० हे १४.७० आर आकार ४ रु ६० पै. यासी चतु:सिमा
पूर्वेस- गट नं.५२९, पश्चिमेस- गट नं.५३१,
दक्षिणेस- गट नं.५३३, उत्तरेस- गट नं.५२४.

२. मौजे म.कानडामाना येथील गट नं.५३१ चे क्षेत्र ला.ला. ० हे २८.८० आर + पो.ख. ० हे ०१ आर एकूण ० हे २९.८० आर आकार ४ रु ६० पै. यासी चतु:सिमा
पूर्वेस- गट नं.५३०, पश्चिमेस- गट नं.५३५,
दक्षिणेस- गट नं.५३२, उत्तरेस- गट नं.५२४, ५३६.

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक बेबीबाई रतीलाल माळी रा.जैताणे ता.साक्री जि.धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. **धुळे, दिनांक- १४/०४/२०२६**

ॲड.रोहित राजकुमार छाबिडया
ब्लॉक नं.आर/२, रूम नं.१, कुमार नगर, साक्री रोड, धुळे.
मो.नं.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५

जाहीर नोटीस

ॲड. भूषण बी. मराठे
ऑफिस : विरदेल रोड,शिदखेडा

शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज्ज सो. (ज्युनीअर डिव्हीजन) यांचे कोर्टात

दिवाणी कि. अर्ज नं. १२७/२०२६
नि. ६

१) **मनिषा भ्र. विजय पाटील**, उ. व. ४४, धंदा : घरकाम
राहणार मुकटी (सवाई मुकटी) ता. शिंदखेडा व सुरत
२) **रश्मि विजय पाटील**, उ. व. २६, धंदा : शिक्षण
३) **निकिता विजय पाटील**, उ. व. २४, धंदा : शिक्षण
अर्जदार : नं. २ व ३ रा. प्लॉट नं., ६०७, गांधी कुटीर,
जी. एच. बी. रोड, शक्ती नगर जवळ, उधना जि. सुरत ..अर्जदार

।।विरूध्द।।

कोणीही नाही
विजय त्र्यंबक पाटील - बेपत्ता
बेपत्ता समयी कायमचे रा. मुकटी ता. शिंदखेडा जि. धुळे .... जाबदेणार

ज्याअर्थी विजय त्र्यंबक पाटील हे अर्जदार नं. १ चे पती असून अर्जदार नं. २ व ३ चे वडील होते. विजय त्र्यंबक पाटील हे सन २००९ सालापासून बेपत्ता झालेले आहेत. अर्जदार नं. १ ही विधवा पत्नी ह्या नात्याने व अर्जदार नं. २ व ३ ह्या मुली ह्या नात्याने बेपत्ता विजय त्र्यंबक पाटील ह्यांचे कायदेशीर वारस आहेत असे हेअरशीप सर्टिफिकेट वारसा दाखला मिळावा ह्या मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरचे अर्जाचे कामी जर कोणाला काही म्हणणे मांडावयाचे असेल तर ते म्हणणे मांडण्यासाठी त्यांनी दि. १५/०६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. ह्या मे. न्यायालयात जातीने किंवा ज्यास यथा योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जे वादा संबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकतील अशा वकीलांमार्फत ह्या न्यायालयात उपस्थित रहावे.

जर वर नमूद केलेल्या दिवशी कोणाचे काही म्हणणे न आल्यास सदर अर्जातील वादाची सुनावणी केली जाऊन निर्णय केला जाईल.

आज दि. ०९/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही:... — (कोर्टाचा शिक्का) — सही...
कामगिरी क्लर्क — **सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय,कनिष्ठ स्तर शिंदखेडा

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँक, पतपेढी, वित्तीय संस्था, संबंधितास मिळकतीचे मुळ मालक तसेच मिळकतीबाबत व त्यांचेकडील या मिळकतीबाबत हक्क दाखविणाऱ्या सर्व वारसांस तसेच इतर कुठल्याही स्वरुपाचा व्यवहार करणार सर्व संबंधितास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. कमलेश मनोहर पाटील रा. धमडाई ता. जि. नंदुरबार यांनी उताऱ्यावरील मालक श्री. प्रकाश रघुनाथ महाले व इतर रा. दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे यांचे सोबत मौजे दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे शिवारातील दोंडाईचा नगरपालिका हद्दीतील शेतजमीन ग. नं. ४६४/२ (खाते क्र. ६७२१२)चे एकूण क्षेत्र ०१ हे. ९६ आर. आकार ०३ रु. १० पैसे यास चतु:सिमा गाव नकाशा प्रमाणे येणे प्रमाणे मिळकतीचा कायम खरेदी घेण्याचा सौदा अगर करार केलेला असून आमचे पक्षकारंनी लिहून देणार यांना काही रक्कम बयाणा म्हणून देखील दिलेली असून सौदा करुन घेतलेला आहे. आमचे पक्षकार लवकरच व्यवहार पूर्ण करणार आहेत.सदर नोटीसहे टायटल व्हेरिफिकेशन नोटीस आहे. तरी सदर व्यवहाराबाबत मिळकतीचे कुठल्याही हितचिंतकांची, सौदा करार,मदार खरेदी, खावटी व इतर वारस ज. मु. मृत्यूपत्र वगैरे करणार यांची अगर कोणाचाही कुठल्याही स्वरुपाचा व्यवहार करणारे बँक, पतपेढी, वित्तीय संस्था यांची अगर कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत, दावा, फाटा,वहिवाट, इतर अधिकार असल्यस तसेच इतर कुणाचे मालकी हक्क असल्यास खरेदीखताचे ओरिजनल दस्त असल्यास बेकायदेशीर व्यवहार होत आहे किंवा उताऱ्यावरील मालकाचे हक्काबाबत अगर मिळकत दुबार खरेदीखत होत आहे. वगैरे आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत आमचे पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी स्वरुपात हरकत कळवावी. परस्पर वर्तमानपत्रात हरकत घेवू नये. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ह्या आमचे पक्षकारांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. मुदतीत कोणाचीही लेखी तक्रार योग्य त्या कागदपत्रांसह प्राप्त न झाल्यास मिळकत निर्बोज समजून आमचे पक्षकार हे व्यवहार पूर्ण करतील. परस्पर वर्तमानपत्रात दिलेली हरकत ग्राह्य धरण्यात येणार नाही. सदरची नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांच्यावतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस देण्यात येत आहे. दोंडाईचा दि. १४/०४/२०२६

ॲड. सचिन अशोक चौधरी
दोंडाईचा सिव्हिल ॲण्ड क्रिमिनल कोर्ट आवार,
शॉप नं. ०३, ४२५४०८ जि. धुळे मो. ९४२२६१९६०१

जाहीर नोटीस

तमाम नागरिक, बँक, वित्तीय संस्था व आर्थिक महामंडळ यांना सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे तऱ्हाडी त.त. तालुका शिरपूर जिल्हा धुळे शिवारातील गट क्रमांक ३८, क्षेत्र १ हेक्टर १८ आर. पोट खराब क्षेत्र ०० हेक्टर ६८ आर. एकूण क्षेत्र १हे. ७६ आर, आकार ४ रुपये ०० पैसे येणेप्रमाणे वर्णनाच्या शेत मिळकतीचा सौदा व ताबा करारनामा सदर शेतीचे मालक व कब्जेदार अरुणाबाई बालू करंके यांनी दिनांक १६/०३/२०२६ रोजीच्या नोटरी करारनामानुसार आमच्या अशिलांच्या लाभात सौदा व ताबा करारनामा करुन दिलेला आहे. सदर सौदा व ताबा करारनामानुसार आमचे अशिल हे लवकरच पूर्तता करणार असून त्याद्वारे सदर शेत मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी सदर सौदा व ताबा करारनामाबाबत व त्यानुसार प्रस्तावित व्यवहार पूर्ण करुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार असल्याबाबत कोणासही काही एक हरकत, मालकी हक्क, ताबा, दिवाणी दावा, मनाई हुकूम आदेश, जप्ती, टाच, गहाण, दान, विक्री, बक्षीस, तसेच इतर कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण व इतर व्यवहार खावटी, नुकसान भरपाई दावे व इतर प्रकारे हक्क व अधिकार तसेच हितसंबंध असल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत खाली नमूद पत्त्यावर कायदेशीर कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात नोंदवावी. अन्यथा नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसानंतर कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास अथवा मुदतीनंतर हरकत प्राप्त झाल्यास व योग्य कायदेशीर दस्ताविना प्राप्त झाल्यास, कोणासही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदर करारनामानुसार वर नमूद शेत मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. कळावे. शिरपूर दि. १३/०४/२०२६

सदर नोटीस पक्षकारांनी दिलेल्या माहितीवरुन आमच्या मार्फत प्रसिद्धीस दिली असे. हरकतीसाठी पत्ता :-

ॲड.कल्पना बी. पाटील
२९,गायत्री कॉलनी, शिरपूर तालुका शिरपूर जि. धुळे

नोटीस -जाहिरनामा

शिरपूर येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. तथा मे. तहसिलदार सो. यांचे कोर्टात

जन्म नोंद अर्ज नं. /२०२६

आरेफा बी अब्दुल शकूर कुरेशी उ.व. ३६, गृहीणी
रा.घर नं. १३१/बी गोसिया मस्जिद, कुरेशी मोहल्ला शिरपूर,
ता.शिरपूर जि. धुळे ...अर्जदार

।।विरूध्द।।

म.मुख्याधिकारी सो. शिरपूर वरवाडे नगर परिषद,
शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे .... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी म. तहसिलदार सो. शिरपूर यांचे न्यायालयात दाखल केलेल्या अर्जानुसार अर्जदार नामे आरेफा बी अब्दुल शकूर कुरेशी यांचा जन्म दि. ०१/०६/१९८९ रोजी मौजे शिरपूर, ता. शिरपूर जि. धुळें येथे जन्म झालेबाबत जन्म नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार याने महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ उपकलम (२)(३) प्रमाणे जन्म नोंद होणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जास कोणाची काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास अर्ज दाखल केल्याचा दिनांकापासून त्यांनी १० दिवसांच्या आत म. कार्यकारी दंडाधिकारी साहेब शिरपूर यांच्या न्यायालयात स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल. दि. १३/०४/२०२६ ठिकाण- शिरपूर

ॲड. विजयकुमार सी. तिवारी
शिरपूर जि. धुळे

नोटीस -जाहिरनामा

शिरपूर येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. तथा मे. तहसिलदार सो. यांचे कोर्टात

जन्म नोंद अर्ज नं. /२०२६

शेख खलील अब्दुल शकूर कुरेशी उ.व. ३७,धंदा : मजुरी
रा.घर नं. १३१/बी गोसिया मस्जिद, कुरेशी मोहल्ला शिरपूर,
ता.शिरपूर जि. धुळे ...अर्जदार

।।विरूध्द।।

म.मुख्याधिकारी सो. शिरपूर वरवाडे नगर परिषद,
शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे .... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी म. तहसिलदार सो. शिरपूर यांचे न्यायालयात दाखल केलेल्या अर्जानुसार स्व:त अर्जदार नामे शेख खलील अब्दुल शकूर कुरेशी यांचा जन्म दि. ०७/०६/१९८८ रोजी मौजे शिरपूर, ता. शिरपूर जि. धुळे येथे जन्म झालेबाबत जन्म नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार याने महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ उपकलम (२)(३) प्रमाणे जन्म नोंद होणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जास कोणाची काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास अर्ज दाखल केल्याचा दिनांकापासून त्यांनी १० दिवसांच्या आत म. कार्यकारी दंडाधिकारी साहेब शिरपूर यांच्या न्यायालयात स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल. दि. १३/०४/२०२६ ठिकाण- शिरपूर

ॲड. विजयकुमार सी. तिवारी
शिरपूर जि. धुळे

नोटीस -जाहिरनामा

शिरपूर येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. तथा मे. तहसिलदार सो. यांचे कोर्टात

जन्म नोंद अर्ज नं. /२०२६

शेख शाकीर शेख शकूर कुरेशी उ.व. ४१,धंदा : मजुरी
रा.घर नं. १३१/बी गोसिया मस्जिद, कुरेशी मोहल्ला शिरपूर,
ता.शिरपूर जि. धुळे ...अर्जदार

।।विरूध्द।।

म.मुख्याधिकारी सो. शिरपूर वरवाडे नगर परिषद,
शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे .... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी म. तहसिलदार सो. शिरपूर यांचे न्यायालयात दाखल केलेल्या अर्जानुसार अर्जदार नामे शेख शाकीर शेख शकूर कुरेशी यांचा जन्म दि. ०१/०६/१९८४ रोजी मौजे शिरपूर, ता. शिरपूर जि. धुळे येथे जन्म झालेबाबत जन्म नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार याने महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ उपकलम (२)(३) प्रमाणे जन्म नोंद होणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जास कोणाची काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास अर्ज दाखल केल्याचा दिनांकापासून त्यांनी १० दिवसांच्या आत म. कार्यकारी दंडाधिकारी साहेब शिरपूर यांच्या न्यायालयात स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल. दि. १३/०४/२०२६ ठिकाण- शिरपूर

ॲड. विजयकुमार सी. तिवारी
शिरपूर जि. धुळे

नोटीस -जाहिरनामा

शिरपूर येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. तथा मे. तहसिलदार सो. यांचे कोर्टात

जन्म नोंद अर्ज नं. /२०२६

शबाना परविन अब्दुल शकूर उ.व. ४६, गृहीणी
रा.घर नं. १३१/बी गोसिया मस्जिद, कुरेशी मोहल्ला शिरपूर,
ता.शिरपूर जि. धुळे ...अर्जदार

।।विरूध्द।।

म.मुख्याधिकारी सो. शिरपूर वरवाडे नगर परिषद,
शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे .... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी म. तहसिलदार सो. शिरपूर यांचे न्यायालयात दाखल केलेल्या अर्जानुसार स्वत: अर्जदार नामे शबाना परविन अब्दुल शकूर यांचा जन्म दि. ०१/०६/१९८७ रोजी मौजे शिरपूर, ता. शिरपूर जि. धुळे येथे जन्म झालेबाबत जन्म नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार याने महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ उपकलम (२)(३) प्रमाणे जन्म नोंद होणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जास कोणाची काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास अर्ज दाखल केल्याचा दिनांकापासून त्यांनी १० दिवसांच्या आत म. कार्यकारी दंडाधिकारी साहेब शिरपूर यांच्या न्यायालयात स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल. दि. १३/०४/२०२६ ठिकाण- शिरपूर

ॲड. विजयकुमार सी. तिवारी
शिरपूर जि. धुळे

नोटीस -जाहिरनामा

शिरपूर येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. तथा मे. तहसिलदार सो. यांचे कोर्टात

जन्म नोंद अर्ज नं. /२०२६

अफसाना बी बिंते अब्दुल शकूर उ.व. ४८, गृहीणी
रा. घर नं. १३१/बी गोसिया मस्जिद, कुरेशी मोहल्ला शिरपूर,
ता.शिरपूर जि. धुळे ...अर्जदार

।।विरूध्द।।

म.मुख्याधिकारी सो. शिरपूर वरवाडे नगर परिषद,
शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे .... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी म. तहसिलदार सो. शिरपूर यांचे न्यायालयात दाखल केलेल्या अर्जानुसार अर्जदार नामे अफसाना बी बिंते अब्दुल शकूर यांचा जन्म दि. ०१/०६/१९७७ रोजी मौजे शिरपूर, ता. शिरपूर जि. धुळे येथे जन्म झालेबाबत जन्म नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार याने महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ उपकलम (२)(३) प्रमाणे जन्म नोंद होणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जास कोणाची काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास अर्ज दाखल केल्याचा दिनांकापासून त्यांनी १० दिवसांच्या आत म. कार्यकारी दंडाधिकारी साहेब शिरपूर यांच्या न्यायालयात स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल. दि. १३/०४/२०२६ ठिकाण- शिरपूर

ॲड. विजयकुमार सी. तिवारी
शिरपूर जि. धुळे

पान १ वरून

चीनने तोडला अमेरिकेच्या नाकाबंदीचा चक्रव्यूह

ट्रम्प जागतिक राजकारणात एकटे?

एकूणच या मोहिमेत अमेरिका एकाकी पडताना दिसत आहे. ब्रिटनसह अनेक नाटो देशांनी आपली सेना होर्मुजमध्ये पाठवण्यास नकार दिला आहे. त्यातच चीन आणि इराणच्या जहाजांनी नाकेबंदी झुगारल्याने ट्रम्प यांच्या धोरणात्मक पराभवाची चर्चा रंगली आहे. आता ही परिस्थिती कधी निवळते आणि भारतासह जगाला होणारा तेल-गॅस पुरवठा कधी सुरळीत होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अशोक खरात रवानगी पुन्हा पोलिस कोठडीत

न्यायाधीशांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना खरातने पोलिसांनी मारहाण केली नसल्याचे स्पष्ट केले. सरकारी वकील ॲड. शैलेंद्र बागडे यांनी न्यायालयात खरातच्या गुन्ह्याची भीषणता मांडली. त्यांनी सांगितले की, आरोपी स्वत:ला देवाचा अवतार म्हणवून महिलांना जाळ्यात ओढत होता. महिलांना तांब्याच्या भांड्यातील पाणी आणि पेढा खाऊ घालायचा, ज्यात गुंगीचे औषध मिसळलेले असायचे. मी देवाचा अवतार आहे. माझ्याशी संबंध ठेवल्याने तू पवित्र झाली आहे, असे सांगून तो महिलांचे लैंगिक शोषण करायचा. गुंगीच्या औषधात नेमके काय मिसळले होते आणि या भोंदूगिरीसाठी तो कोणत्या रत्नांचा वापर करत होता, याचा शोध घेण्यासाठी पाच दिवसांच्या कोठडीची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

आरोपीच्या वकिलांचा विरोध

खरातचे वकील ॲड. सचिन भाटे यांनी पोलिस कोठडीला विरोध केला. मागील गुन्ह्यांमध्येही पोलिसांनी असाच युक्तिवाद केला होता आणि तो तपास झालेला आहे. त्यामुळे पुन्हा कोठडीची गरज नाही, असा दावा त्यांनी केला. मात्र, सरकारी पक्षाने हा गुन्हा वेगळ्या महिलेशी संबंधित असून तपास महत्त्वाचा असल्याचे सांगितल्याने न्यायालयाने पाच दिवसांची कोठडी मंजूर केली.

लोकसभेतील खासदारांची संख्या आठशे पन्नास होणार

मानला जात आहे. या अंतर्गत लोकसभा आणि राज्याच्या विधानसभांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षण लागू होणार आहे. डिलिमिटेशन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महिलांसाठी एक-तृतीयांश जागा राखीव केल्या जातील. या जागांचे रोटेशन केले जाईल आणि आरक्षणाची मुदत १५ वर्षे ठेवण्यात येणार आहे.

ईशान्य राज्यांसाठी विशेष तरतुदी

विधेयकात अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोरम आणि नागालँड यांसारख्या ईशान्य राज्यांमध्ये अनुसूचित जमातींचे प्रतिनिधित्व कायम राखण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्रिपुरामध्येही सध्याचे प्रमाण जतन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. नवीन तरतुदी लागू होईपर्यंत सध्याची लोकसभा आणि विधानसभांचा कार्यकाळ अबाधित राहणार आहे. डिलिमिटेशन पूर्ण झाल्यानंतरच नवीन रचना लागू होईल, त्यामुळे प्रशासनात सातत्य राहील. या विशेष अधिवेशनात सरकार तीन महत्त्वाचे विधेयक सादर करणार असून, त्यामध्ये जागा वाढवण्याचा प्रस्ताव, डिलिमिटेशन विधेयक २०२६ आणि केंद्रशासित प्रदेश कायद्यात सुधारणा यांचा समावेश आहे.

देशात पाच विधानसभांच्या निवडणूकीनंतर

वाटा सातत्याने कमी होत आहे. आर्थिक वर्ष २०१७ मध्ये ते २२ टक्के होते. आता ते केवळ ८ टक्के पर्यंत खाली आले आहे. सरकारने संपूर्ण उत्पादन शुल्क काढून टाकले तरी सध्याच्या किमतीनुसार तेल कंपन्यांचे नुकसान पूर्णपणे भरून निघणार नाही. ऑगस्ट २०२२ नंतर प्रथमच अमेरिकेत पेट्रोलची सरासरी किंमत प्रति गॅलन चार डॉलरच्या वर गेली आहे. पाकिस्तान, नेपाळ आणि श्रीलंका यांसारख्या अनेक शेजारी देशांनीही पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढवल्या आहेत.

भारतात किंमती कशा ठरतात?

जून २०१० पर्यंत पेट्रोलची किंमत सरकार ठरवत असे. त्यात दर १५ दिवसांनी सुधारणा केली जात असे. मात्र, २६ जून २०१० नंतर सरकारने पेट्रोलच्या किमती ठरवण्याचे काम तेल कंपन्यांवर सोपवले. त्याचप्रमाणे ऑक्टोबर २०१४ पर्यंत डिझेलची किंमतही सरकारच ठरवत असे. मात्र, १९ ऑक्टोबर २०१४ पासून सरकारने हे कामही तेल कंपन्यांकडे सोपवले आहे. सध्या तेल कंपन्या आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाची किंमत, विनिमय दर, कर, वाहतूक खर्च आणि इतर घटकांचा विचार करून पेट्रोल आणि डिझेलची किंमत दररोज ठरवतात. देशात आसाम, केरळ, पुदुच्चेरी, तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल या राज्यात निवडणुका आहेत. त्यामुळे या निवडणुका संपल्यानंतर पेट्रोल, डिझेलचे दर वाढण्याची शक्यता आहे.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर

घेण्यात आला. खा.डॉ. शोभा बच्छाव, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, बसपा जिल्हाध्यक्ष राज चव्हाण, उपाध्यक्ष भैय्या पारेराव, योगेश जगताप, रमेश श्रीखंडे, साबीर मुहिबुल्लाह, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे जोसेफ मलबारी, शामकांत खोंडे, पितांबर महाले, अलोक रघुवंशी, प्रा.मोहन मोरे, राजेंद्र जिरेकर आदि मान्यवर उपस्थित होते.

लोकजनशक्ती पार्टीतर्फे चहापान

महामानवाच्या अभिवादनासाठी आलेल्या प्रत्येक अनुयायाकरीता लोकजनशक्ती पार्टीच्या वतीने चहापानाला पहाटे पासून प्रारंभ झाला. याठिकाणी धुळे शहराचे आमदार आ.अनुप अग्रवाल, महापौर मायादेवी परदेशी, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, शहर पोलीस स्टेशनचे पोनि.दिपक पाटील, लोकजनशक्ती पार्टीचे जिल्हाध्यक्ष दिलीप साळवे, महिला नेत्या शोभा चव्हाण, वाल्मिक जाधव, बाबा शिरसाठ, कुंदन खरात यांच्यासह अनेक अनुयायी उपस्थित होते.

शिवसेना उबाठाने केले अभिवादन

घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना शिवसेना उबाठाच्या वतीने माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपनेत्या शुभांगी पाटील, जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, नरेंद्र परदेशी, पंकज भारस्कर, अण्णा फुलपगारे, धीरज पाटील, ॲड.विवेक सुर्यवंशी, सुजर भावसार, अनिता मोरे, जयश्री वानखेडे, अरूणा मोरे, ज्योती चौधरी, डॉ.अनिल पाटील, संदीप सुर्यवंशी यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

महिला महाविद्यालयातर्फे शाश्वत विकास

शाश्वत शहरे, तसेच जबाबदार उपभोग व उत्पादन या विषयांवर भाष्य केले. यानंतर २ सत्रांत संशोधन निबंध सादर करण्यात आले. पहिल्या सत्राचे अध्यक्षपद प्राचार्य, गव्हर्नमेंट फर्स्ट ग्रेड कॉलेज, अंकोला कर्नाटक डॉ. विजया पाटील यांनी भूषवले, तर दुसऱ्या सत्राचे अध्यक्षपद प्राचार्य, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, एस.व्ही. विद्यापीठ, तिरुपती डॉ. बी.व्ही. मुरलीधर यांनी भूषवले.

समारोप सत्रात प्रमुख मार्गदर्शक, एस.टी.के.पी., पी.जी.आर.आय. बँडनर, लॅम्पग इंडोनेशिया डॉ. गलूह द्वि एजंग, अध्यक्ष, एन. मुक्ता संघटना, जळगाव प्रा. डॉ. नितीन बारी, तसेच संचालिका, ट्रायबल एज्युकेशन सोसायटी प्रा.संगीता वसावे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी प्राध्यापक, डॉ. राम मनोहर लोहिया विधी विद्यापीठ, लखनौ प्रा. डॉ. अलका सिंग होत्या. या परिषदेत विविध देशांतील व राज्यातील संशोधकांनी सहभाग नोंदवून आपले संशोधन निबंध सादर केले.

चर्चासत्राचे आयोजन समन्वयक डॉ. मधुकर देसले नंदुरबार व डॉ. वंदना बनकर छत्रपती संभाजीनगर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विष्णू शेवाळे, डॉ. श्रीराम दाऊतखाने, प्रा. डॉ. एस. एच. जैदी व प्रा. मीना कौसर यांनी केले.

अन्वर नाला परिसरात हल्ला; चौघे गंभीर

धुळे, दि.१४- धुळे तालुक्यातील पिंप्री शिवारातील अन्वर नाल्या काठी रमेश मोरेंच्या अंगणातील वाहनाला धडक दिल्याच्या कारणावरून वाद झाला. त्यानंतर तेरा जणांनी मोहन मोरे यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांवर हल्ला चढविला. ही घटना दि.१३ एप्रिल रोजी दुपारी घडली.

या घटनेत मोहन मोरेंसह त्यांचा भाऊ किशोर भाऊजाई सुनिता, भाचा सागर पवार हे जखमी झाले. हल्ल्यात लोखंडी रॉड, काठ्यांचा वापर करण्यात आला. मोरे यांच्या तक्रारीनुसार भरत पवार यांच्यासह तेरा जणांविरोधात मोहाडी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान १ वरून

स्कूल ऑफ फार्मसी अँड टेक्नॉलॉजी

आणि मानाची परीक्षा म्हणून ओळखली जाते. या परीक्षेत यश मिळवण्यासाठी विषयाचे सखोल ज्ञान, सातत्यपूर्ण अभ्यास, तसेच योग्य मार्गदर्शन अत्यंत आवश्यक असते.

प्राचार्य डॉ. समीर गोयल यांनी विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल समाधान व्यक्त करताना सांगितले की, आमच्या विद्यार्थ्यांनी गेट २०२६ मध्ये मिळवलेले यश हे त्यांच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचे फलित आहे. आमची संस्था विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देण्यापुरती मर्यादित नसून त्यांना संशोधनक्षम, आत्मविश्वासू आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकणारे व्यावसायिक बनवण्यावर भर देते. विद्यार्थ्यांची ही कामगिरी इतरांसाठी प्रेरणादायी आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासावरच नव्हे तर कौशल्य विकासावरही लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

संस्थेतील जी-पॅट, नाईपर व गेट स्पर्धा परीक्षा समितीचे डॉ. कार्तिक नखाते, डॉ. मोहम्मद उस्मान सिद्दीकी, डॉ. पवन गुप्ता, प्रा. साक्षी नळकांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवला आहे.

स्कूल ऑफ फार्मसी अँड टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट धुळे ही संस्था नेहमीच गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन आणि नवोपक्रम यावर भर देत आली आहे. नॅक कडून ए प्लस मानांकन प्राप्त असलेली ही संस्था विद्यार्थ्यांना अत्याधुनिक प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय आणि उद्योगाभिमुख शिक्षण देण्यासाठी प्रसिद्ध आहे. गेट मधील हे दैदिप्यमान यश संस्थेच्या प्रगतीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला असून, भविष्यातही अशाच प्रकारे यशाची परंपरा कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या यशाबद्दल एस.व्ही.के.एम. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिश पटेल, सहअध्यक्ष भूपेश पटेल, उपाध्यक्ष चिंतन पटेल, एस.व्ही.के.एम. एन.एम.आय.एम.एस. ग्लोबल युनिव्हर्सिटी प्रेसिडेंट व चान्सलर स्नेहा अंकित पारिख, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल, मार्गदर्शक डॉ.अजय पसारी, प्राचार्य डॉ. समीर गोयल यांनी अभिनंदन करुन भविष्यातही असेच उत्कृष्ट यश मिळवत संस्थेचे नाव उज्ज्वल करण्यासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

ऊस बिल थकल्याने धनंजय अहिरराव यांच्या

करण्याचा इशारा धनंजय अहिरराव यांनी दिला आहे. या आंदोलन प्रसंगी शेतकरी लिंकेश अहिरराव, वैभव सोनवणे, राघो वंजी अहिरराव, सुभाष भीमराव अहिरराव, रमेश सखाराम काकूंस्ते, आनंद उत्तमराव काकुस्ते सह अनेक बाधित शेतकरी उपस्थित होते. पोलीस प्रशासनाच्या भूमिकेबद्दल सर्व शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले परंतु साक्री तहसीलदारांनी सुचवलेल्या मालेगाव तालुक्यातील तहसील कार्यालयात आंदोलन करावे तसेच तहसीलदार यांच्या भूमिकेबद्दल नाराजी व्यक्त केली.

वारुड येथे पालकमंत्री रावलांच्याहस्ते

माजी जिल्हा परिषद सदस्य नथा वारुडे, बांधकाम विभागाचे अभियंता श्री.बरे व कनिष्ठ अभियंता श्री सोनवणे यांच्यासह विविध मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री रावल म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दलित वस्तीतील विविध विकासकामांचे भूमिपूजन होत असल्याने समाधान वाटत आहे. वारुड गावातील गोरगरीब कष्टकरी नागरिकांसाठी २० लाख रुपयांच्या राजमाता मंदिराचे तसेच गुलजार नदीवर दलित वस्तीला जोडणाऱ्या पुलासाठी २५ लाख रुपयांच्या कामांचा समावेश असून एकूण ४५ लाख रुपयांची विकासकामे हाती घेण्यात आली आहेत.

तसेच वारुड परिसरात विवध उद्योग येत असून या उद्योगांच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. यापूर्वीही गावाच्या विकासासाठी नवीन तलाठी कार्यालय, रस्ते, पेवर ब्लॉक, नवीन सभागृह, २५ के.व्ही. ट्रान्सफॉर्मर, पिण्याच्या पाण्याच्या योजना आदी कामांसाठी स्थानिक विकास निधीतून सुमारे १ कोटी ३० लाख रुपयांचा निधी देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच सामान्य माणसाच्या विकासासाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. या कार्यक्रमास ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे लोकार्पण

खा. डॉ.बच्छावांसह माजी आ.कुणाल पाटलांची उपस्थिती

सोनगीर दि.१४ (प्रतिनिधी)- ऐतिहासिक वारसा लाभलेल्या सोनगीर गावात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाचा लोकार्पण सोहळा अत्यंत उत्साहात आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला. या स्मारकाचे लोकार्पण माजी आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धुळे लोकसभा मतदार संघाच्या खा.शोभा बच्छाव होत्या. या सोहळ्याचे औचित्य साधून बाबासाहेबांची जयंतीही मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे स्मारक सौंदर्याच्या दृष्टीने जिल्ह्यात लक्षवेधी ठरले आहे. या स्मारकासाठी माजी आमदार कुणाल पाटील यांच्या स्थानिक विकास निधीतून पंधरा लाख रुपये आणि सोनगीर ग्रामपंचायतीच्या पाच लाख रुपयांच्या निधीतून एकूण वीस लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. या भव्य स्मारकामुळे गावाच्या वैभवात मोलाची भर पडली आहे.

लोकार्पण प्रसंगी मार्गदर्शन करताना माजी आमदार कुणाल पाटील म्हणाले की, धुळे जिल्ह्यातील डॉ. बाबासाहेबांचे सर्वात सुंदर स्मारक सोनगीरमध्ये उभे राहिल्याचा मला सार्थ अभिमान आहे. येथे भविष्यात बाबासाहेबांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी आम्ही सर्वतोपरी सहकार्य करू.सोनगीरच्या वाढत्या विस्तारावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, एमआयडीसीमुळे गावाची वस्ती वाढत असून, गावाला आता नगरपंचायत दर्जा मिळणे आवश्यक आहे. नगरपंचायत झाल्यास शासनाकडून भरीव निधी मिळून पायाभूत सुविधा अधिक सक्षम होतील, यासाठी आपले प्रयतव सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, आपल्या कार्यकाळात व्यायामशाळा, पाणीपुरवठा व रस्ते विकास केल्याचे समाधान व्यक्त करत त्यांनी मध्यवर्ती बस स्थानकाचा प्रश्न युद्धपातळीवर सोडवण्याचे आश्वासन दिले.

खासदार शोभा बच्छाव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्मारकाच्या कामाचे आणि कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. त्या म्हणाल्या की, सोनगीरच्या सामाजिक सभागृहासाठी, अंगणवाडी आणि अमरधाममधील सुविधांसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. गावातील बस स्थानकाच्या प्रश्नाबाबत मी स्वतः जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून पाठपुरावा करणार आहे. तसेच स्मारकाच्या परिसरात वॉल कंपाउंड, शेड आणि पूर्णाकृती पुतळ्यासाठी विशेष निधी देण्याचे प्रतिपादन त्यांनी केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सायंकाळी सात वाजता विद्युत रोषणाईने सजवलेल्या वाहनावरून डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांचा आणि ग्रामस्थांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

या सोहळयाला गटनेते अविनाश महाजन, प्रभारी सरपंच लखन ठेलारी, सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार देवरे, युवा उद्योजक राजेंद्र महाजन, आरपीआयचे शशिकांत वाघ, विक्रीकर उपायुक्त भानुदास महाजन, अविनाश थोरात, कल्याण गरुड, अमित बागुल, आर.के. माळी, आरपीआयच्या नबाताई शिरसाठ, प्रकाश गुजर, ज्ञानेश्वर चौधरी, दंगल धनगर, प्रमोद धनगर, पंढरीनाथ शिरसाठ, देवभाण्याचे माजी सरपंच संजय देसले, सायनेचे योगेश पाटील, मनीलाल पाटील, प्रताप पाटील,ज्ञानेश्वर चौधरी, वसंत पाटील (दापुरा), हसन खा पठाण,चंद्रकांत इंदासराव, दिलीप माळी,योगेश शिरसाठ,हर्षल गुजर, नंदू धनगर, राजेंद्र जाधव, विशाल कासार,पी के शिरसाठ, मुन्ना मेंबर, जब्बार कुरेशी, दिनेश देवरे, अहमदशाह फकीर,देवीसिंग सोनवणे, ग्राम विकास अधिकारी मेघशाम बोरसे, हरिश्चंद्र पाटील, किशोर पावनकर, भुरा पैलवान, पिंटू भिल,शाम रघुनाथ वाणी, उत्तम महाजन,प्रकाश गुजर,चंद्रकांत शिरसाठ, यांसह अनेक आजी-माजी पदाधिकारी, पत्रकार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्मारक समितीचे अध्यक्ष माजी सरपंच केदारेश्वर मोरे, मुरलीधर मोरे, वसंत मोरे, अरुण मोरे, संभाजी घोडके,योगेश शिरसाठ तसेच बौद्ध विकास मंडळ, बौद्ध पंचमंडळ, भीमरत्न प्रतिष्ठान, बाबा ग्रुप, सार्वजनिक भीम जयंती उत्सव समिती यांच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

निधन वार्ता

शांताबाई करंके

तऱ्हाडी, दि.१४ - तऱ्हाडी येथील रहिवासी शांताबाई शालिग्राम करंके यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. तऱ्हाडी आदर्श शेतकरी उध्दव करंके, व बामखेडा कॉलेज माजी प्राचार्य डॉ.छबिलदास करंके यांच्या मातोश्री तर शिंदखेडा एस.एस,वी.पी. कॉलेजचे डॉ. प्रा. तुषार करंके यांच्या आजी होत.

बाबासाहेबांनी देशाला दिलेली अनमोल भेट म्हणजे संविधान- प्रेमचंद अहिरराव

धुळे, दि.१४- देशाच्या भौगोलिक, सामाजिक व भाषिक घटकांचा सखोल अभ्यास करून सर्व स्तरातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी व देशाच्या सार्वभौमत्वासाठी बाबासाहेबांनी देशाला अर्पण केलेली अनमोल भेट म्हणजे संविधान होय. असे प्रतिपादन प्रसिद्ध शिवव्याख्याते प्रेमचंद अहिरराव यांनी निकुंभे ता.जि. धुळे येथे आयोजित आंबेडकर जयंतीच्या कार्यक्रमात केले.



ते पुढे म्हणाले की, प्रचंड विद्वत्ता असलेल्या बाबासाहेब आंबेडकरांना नॉलेज ऑफ सिम्बॉल अर्थातच ज्ञानाचे प्रतीक म्हणत कोलंबिया विद्यापीठाने त्यांचा पुतळा उभा करून सन्मान केलेला आहे. जगातील सर्वात हुशार विद्यार्थी म्हणून विद्यापीठाने बाबासाहेबांचा गौरव करणे ही बाब सर्व भारतीयांची मान उंचावणारी असल्याचे गौरवोद्गारही अहिरराव यांनी याप्रसंगी काढले. कार्यक्रमासाठी गावातील युवक युवती व पुरुष वर्गासोबतच महिलांची संख्या देखील लक्षणीय होती. वामनदादा कर्डकांचे तुफानातले दिवे आम्ही हे गीत सादर करून व्याख्यानाचा समारोप करण्यात आला. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने विविध गटात घेण्यात आलेल्या वकृत्व स्पर्धेतील विद्यार्थ्यांना यावेळी प्रमुख वक्ते व पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजवाडा प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

भगवान झुलेलाल मंदिरात आधार अपडेट शिबीर

धुळे, दि.१४- साक्री रोड परिसरातील कुमार नगर मधील पूज्य भगवान झुलेलाल मंदिरात दि.१५ ते १८ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेच्या कालावधीत प्रभाग क्र.१० मधील नागरिकांच्या सोयीसाठी सिंधी सामाजिक सेवा संस्था, धुळे यांच्या वतीने आधार अपडेट शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिर सुरू असतांना दुपारी १ ते २ या वेळेत भोजन विश्रांती राहणार आहे. या शिबिरामध्ये नागरिकांना आधार कार्ड संदर्भातील विविध सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामध्ये मोबाईल नंबर लिंक/अपडेट, बायोमेट्रिक अपडेट, फोटो अपडेट, पत्ता बदल, जन्मतारीख दुरुस्तीसाठी जन्म प्रमाणपत्र आवश्यक तसेच नावामध्ये बदल गॅझेट, मॅरेज सर्टिफिकेटच्या आधारे यांचा समावेश आहे.

नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे. अपूर्ण कागदपत्रांमुळे काम करण्यात येणार नाही. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी मो. ९९२३४५४००८ आधार ऑपरेटर किंवा आयोजक दीपक मुरलीधर लुल्ला मो. ८३०८१६३००६ यांच्याशी संपर्क साधावा. या शिबिराचे आयोजन सिंधी सामाजिक सेवा संस्था, धुळे यांच्या वतीने करण्यात आले.

पाहिजे
ऑफिस सफाई कर्मचारी पाहिजे.
-: संपर्क :-
मो. नं. 7276158096

पाहिजेत
१) रिसेपशनिस्ट,
२) नर्सेस GNM / ANM
३) वॉचमन,
४) ड्रायव्हर,
समक्ष भेटा :-
तेजनक्ष हेल्थकेअर
इन्स्टीट्यूट ऑफ युरोलॉजी
साक्री रोड, धुळे

भरपूर पगार...भरपूर सवलती
✪ साड्यांच्या घड्या करण्यासाठी लेडीज लावणे आहे. जागा - ५
✪ अनुभवी व हुशार सेल्समन लावणे आहे. जागा - ५
✪ हेल्पर पार्टटाईम/फुलटाईम पाहिजे . जागा - ५
-: समक्ष भेटा :-
आकाशदीप साडी एम्पोरियम
जे. बी. रोड, धुळे ☎२३३२३०

पाहिजेत
बेकरीच्या मालाच्या वाटपासाठी सेल्समन/माणूस पाहिजे. लिहीता, वाचता आणि हिशोब करता येणे आवश्यक.
लाईफलाईन बेकरी
मालेगावरोड, यल्लमा देवी मंदिराजवळ, धुळे
7507699616

पाहिजे
२०००/३००० स्के.फूट पत्र्याचे जुने शेड पत्रे विकत पाहिजे.
-: संपर्क :-
9373929129

शेतकरी माल खरेदी
शेतकरी गहू, मका, ज्वारी व इतर शेतकरी माल कोणत्याही खर्चाशिवाय MIDC धुळे येथे खरेदी सुरु आहे.
-: संपर्क :-
9403453061
9673942025

फ्लॅट विकणे
2 BHK ग्राऊंड फ्लोअर फ्लॅट, १०० फुटी रोड, समता नगर जवळ, शासकीय डेअरी समोर, धुळे
L.G.Properties
9793093955

प्लॉट विकणे आहे
डोंगरे महाराज नगर मागे, साईराम नगर मध्ये ८०० व १६०० चौ.फूट प्लॉट विकणे आहे.
L.G.Properties
9793093955

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर क्लर्क पुरुष-२, महिला-२
आकर्षक पगार!
लोकमान्य हॉस्पीटल
चाळीसगावरोड, धुळे
9766574679

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, **हेमंत सुधाकर मदाने** यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र कार्यालय, 'जनशक्ती', वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दूरध्वनी मुख्य कार्यालय, **धुळे- (०२५६२) २३५३९६,२३८३९६, फॅक्स २३३७६३,**
E-Mail- aplamaha@gmail.com, ndbapla@gmail.com नंदुरबार २२३४४४, aplamahashd@gmail.com शहादा-२२४८४८, शिरपूर-२५६९३१, मालेगाव- २४३१३३६, नाशिक-२५७५९८९, **पुणे-४००४१९५. आपला महाराष्ट्र**-रजि. नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०